28 JULY TO 03 AUGUST 2025 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 7/26/2025 9:17 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : २९ सोमवार दि. २८ जुलै २०२५ ते रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

## मनोरुग्ण तरुण घरात शिरला दाबेलीवाल्याचा गळा चिरला

पुणे : क्राईम रिपोर्टर

माणसाच्या मनावर परिणाम होऊन त्याचे मानसिक स्वस्थ बिघडले कि त्याच्या हातून काहीही घडू शकते. असा मनोरुग्ण माणूस समाजासाठी अत्यंत घातक असतो. कारण त्याच्या मनात जर एखाद्या गोष्टीचा राग असेल तर तो कुणावरही हल्ला करू शकतो. पुण्याच्या स्वारगेट परिसरात अशाच एका मनोरुग्णाने सकाळी ९ च्या सुमारास एका घरात शिरून दाबेली विकणाऱ्या तरुणाचा गळा चिरला. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. ...पान २ वर

## सेवालयात कर्मचाऱ्याकडूनच लैंगिक शोषण झाले एचआयव्ही बाधित अल्पवयीन मुलीला गर्भवती केले




औसा : शिवाजी मोरे

देशातील एक प्रगत आणि सुसंस्कृत राज्य अशी ओळख आलेले महाराष्ट्र आज मात्र गुन्हेगारीचे माहेरघर बनलेले आहे. खास करून लैंगिक अत्याचाराचे गुन्हे वाढत असल्याने महिला तसेच अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. खास करून राज्यातील ज्या आश्रमशाळा आहेत, तिथल्या मुलींचे जबरदस्तीने होणार लैंगिक शोषण हा चिंतेचा विषय बनलेला आहे. शाळा हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते, पण आज याच विद्येच्या माहेरघरात वासनांध नराधमांचा सूळ सुळाट झालेला असल्याने तिथल्या मुली सुरक्षित नाहीत. आश्रम शाळेतील मुलींवर होणार्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांना तिथले शाळा प्रशासन कसे जबाबदार असते हे अनेक वेळा चौकशीतून उघडकीस आलेले आहे. लैंगिक अत्याचाराच्या घटना केवळ शाळा अथवा आश्रम शाळेतच घडतात असे नाही तर मतीमंद, गतिमंद आणि दुर्धर आजार असलेल्या मुलींना ज्या ठिकाणी ठेवले जाते अशा सेवालयामध्येही असे हिडीस आणि संतापजनक प्रकार घडू लागले आहेत. लातूर जिल्ह्याच्या औसा तालुक्यातील हसे गाव येथे सेवली प्रकल्पाच्या बालगृहात एका अल्पवयीन एचआयव्ही बाधित मुलीचे तिथल्याच कर्मचाऱ्याने लैंगिक शोषण करून तिला गर्भवती केल्याची संतापजनक घटना घडली आहे. विशेष म्हणजे सेवाल्याच्या संचालकांनी आरोपीला पोलिसांच्या ताब्यात देण्याऐवजी त्याला पाठीशी घालून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, इतकेच नव्हे तर मुलीचा जबरदस्तीने गर्भपात केला. मात्र हॉस्पिटलमध्ये मुलीने दिलेल्या जबानीवरून सर्व आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून यांना अटक करण्यात आली आहे, तर पिडितेवर बलात्कार करणारा मुख्य आरोपी फरार आहे. एका एचआयव्ही बाधित मुलीवर बलात्कार करणारा हा माणूस नसून सैतान आहे, त्यामुळे त्याला आणि त्याला पाठीशी घालणाऱ्या शाळा संचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

औसा तालुक्यातील हासेगाव येथील सेवालय प्रकल्पाच्या बालगृहात एचआयव्ही संक्रमित अल्पवयीन मुलीवर या संस्थेतील एका कर्मचाऱ्यांने लैंगीक अत्याचार करून तिला गर्भवती केले. तसेच सेवालय प्रकल्प संचालक आणी कर्मचाऱ्यांनी संगणमत करून पडीत अल्पवयीन मुलीच्या इच्छेविरूध्द तिचा गर्भपात केल्याचा धक्कादयक प्रकार समोर आला आहे. पिडीतेच्या फिर्यादीवरून संस्था चालकासह कर्मचारी व अन्य सहा जणांविरुद्ध औसा पोलिस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की, यातील अल्पवयीन पिडित मुलगी ही औसा तालुक्यातील हासेगाव येथील सेवालय बालगृहत ...पान २ वर

## विवाहितेच्या शोषणाचा खेळ खल्लास झाला पत्नीला ब्लॅकमेल करणारा पतीच्या हातून मेला

इचलकरंजी : क्राईम रिपोर्टर



लखन बेनाडे

राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याने अनेक गुंडांनी राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर राजकीय पाठबळावर ते लोकांवर अन्याय अत्याचार करू लागले. रेंदाळ येथे राहणारा एक गुंड लखन आण्णासो बेनाडे याने राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर अनेक महिलांचे लैंगिक शोषण करायला सुरुवात केली होती. मात्र लक्ष्मी विशाल गस्ते हिच्या बाबतीत त्याचा अंदाज चुकला. कारण तिचा पती विशाल हा सुद्धा मोठा गुंड होता आणि एका गुन्ह्यात तुरुंगात शिक्षा भोगत होता. मात्र तुरुंगातून बाहेर येताच पत्नीने त्याला सर्व प्रकार सांगितला. त्यामुळे चिडलेल्या विशाल गस्ते याने साथीदारांच्या मदतीने लखन याची हत्या केली. या प्रकरणी सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.



लखन आण्णासो बेनाडे हा रेंदाळ येथे आई वडिल मुलगी याचेसह राहयला आहे. तो गुन्हेगारी प्रवृतीचा असल्याने तो गावात अनेकांना दादागिरी करीत असायचा. त्याचा संबंध आणि लागेबांधे दोन नंबर धंदयाशी असल्याने आड मार्गाने पैसे मिळविण्यात त्याचा हतखंड होता. त्याचेवर अनेक गुन्हे पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाले होते. आरोग्या खात्यातील महिलेवर बलात्काराचे प्रकरण असो किंवा विनयभंग मारामारी असे गुन्हे त्याचेवर दाखल होते. यातून सुटण्यासाठी त्याने एक मार्ग निवडला. तो राजकीय पक्षाचा कार्यकर्ता म्हणून वावरू लागला. सुरूवातीला म्हणजे सन २०२२ साली अपक्ष म्हणून रेंदाळ ग्रामपंचायतीची निवडणुक लढवली तो निवडून आला आणि ग्रामपंचयात सदस्य बनला त्यांनंतर त्याने मग राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार) गटात त्याने प्रवेश केला. त्या आडून तो अनेक गैर कामात गुंतला. जुलै २०२४ मध्ये एका महिलेने इचलकरंजी येथील शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये लखन बेनाडे याने ...पान २ वर

## दोघांच्या हातून भयंकर गुन्हा घडला चोरी करताना व्यापाऱ्याचा मुडदा पाडला

धुळे : क्राईम रिपोर्टर



आर्थिक संकटात सापडलेला माणूस मदत मिळाली नाही कि नाईलाजाने गुन्हेगारीकडे वळतो. कारण त्याला संकटातून बाहेर पडायचे असते. आकाश आणि अशोक हे दोघे जिवलग मित्र होते. पण दोघेही आर्थी संकटात सापडले होते. आकाशच्या वडिलांना कॅन्सर झाला होता आणि त्याला वडिलांच्या उपचारासाठी पैसे हवे होते, तर अशोकला घर बांधण्यासाठी पैसे हवे होते. पण पैसे न मिळाल्याने त्यांनी चोरी करण्याचा निर्णय घेतला. पण रात्रीच्या वेळी ज्या गोपाल सिंगच्या घरी चोरी करायला गेले त्याला जाग आली आणि तो उठून आरडा ओरडा करू लागला. त्यामुळे आपले बिंग फुटून आपण पकडले जाणार या भीतीने दोघांनी गोपाल सिंगची हत्या केली. म्हणजे एक गुन्हा करायला गेले आणि त्यांच्या हातून दुसरा मोठा गुन्हा घडला. या प्रकरणी दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

जगण्यासाठी पैसे कमावण्याची गरज असते. अलिकडे वाढत्या महागाईत तर कितीही पैसे कमावले तरी गरजा भागत नाही अशी परिस्थिती आहे. त्यातही एखाद्या वेळी आजारपण आले तर त्या कुटूंबाची अत्यंत वाईट परिस्थिती होते. हे त्रासलेले लोक नशिबाला दोष देतात, तर काही वेळा गैरमार्गाचा आधार घेत ...पान २ वर

## शरीरसुखासाठी तिने शेजाऱ्याला धरले पतीची हत्या करून आपल्या घरातच पुरले





नालासोपारा : क्राईम रिपोर्टर

स्त्री असो अथवा पुरुष माणसाला पोटाच्या भुके इतकीच शरीराची भूक असते आणि हि भूक भागली नाही तर माणूस आपली शारीरिक भूक भागवण्यासाठी दुसरा मार्ग शोधतो. नालासोपारा येथील एका महिलेला तिच्या पतीकडून पुरेसे शरीरसुख मिळत नव्हते. त्यामुळे तिने शेजारीच राहणाऱ्या व आपल्यापेक्षा ८ वर्षांनी लहान असलेल्या तरुणाशी अनैतिक संबंध ठेवले. मात्र यात पतीचा अडथळा येवू नये म्हणून दोघांनी मिळून पतीची हत्या केली आणि त्याचा मृतदेह घरातच पुरून प्रियकरासोबत फरार झाली. पण कोणताही गुन्हा कधी लपून राहत नाही कधीना कधी त्याला वाचा फुटतेच, त्याप्रमाणे या गुन्ह्यालाही वाचा फुटली आणि पोलिसांनी आरोपी महिलेला तिच्या प्रियकरासह अटक केली असून त्यांना ३० जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.




नालासोपारा पूर्वेतील धानिव बाग हत्याकांडातील आरोपी महिलेच्या तोंडावरून उडालेल्या ओढणीमुळे आरोपींचा शोध लागला आहे. नालासोपारा पूर्वेतील धानिव बागमधील खळबळजनक हत्याकांडातील आरोपींचा तपास करण्यासाठी पेल्हार पोलीस पुण्यात दाखल झाले होते. तपासाच्या दरम्यान, पुण्यातील हडपसर येथील एका औषध दुकानाजवळ बसलेल्या महिलेच्या तोंडावरून हवेच्या झोक्यामुळे उडालेली ओढणी पोलिसांच्या लक्षात आली. त्या क्षणी पोलिसांनी संशयितांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवले आणि मिळालेल्या माहितीच्या आधारे ...पान २ वर

## दारूच्या व्यसनामुळे त्याचे दिवस भरले जन्मदात्या बापानेच मुलाला ठार मारले

पुणे : क्राईम रिपोर्टर

आई वडील मुलांना आपल्या म्हातारपणाचा आधार समजत असतात. पण काही मुले आई वडिलांचा आधार बनण्याऐवजी त्यांना त्रास देत असतात. पुण्याच्या वडकी भागात दारू पिऊन त्रास देणाऱ्या एका तरुणाला त्याच्या वडिलांनीच ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मात्र जन्मदात्या बापावारच मुलाला ठार मारण्याची वेळ आल्याने या परिसरात खळबळ माजली आहे.

घरात दारू पिऊन आलेल्या मुलाने आई-बापाशी वाद घातला. यात झालेल्या झटापटीत बापाने मुलाचा कापडी गमचाने गळा आवळून त्याचे डोके फरशीवर आपटले. यात मुलाचा मृत्यू झाला. याप्रकरणी जावयाने दिलेल्या फिर्यादीवरून सासऱ्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. प्रशांत सुरेश जमदाडे (३५, रा. कैलासनगर, वलवा वस्ती, वडकी) असे मयताचे नाव आहे. तर सुरेश बाबुराव जमदाडे (५९)असे बापाचे नाव आहे. रविवारी (दि. २०) रात्री साडेनऊच्या सुमारास प्रशांत हा घरात दारू पिऊन आला. त्यावेळी घरामध्ये त्याचीआई शारदा आणि वडील सुरेश हे दोघेही होते. प्रशांतने आई-वडिलांना शिवीगाळ करत झटापट करण्यास सुरूवात केली. यावेळी चिडलेल्या बापाने मुलाचा गळा कापडी गमचाने आवळून त्याचे डोके जिनीवरील फरशीवर आपटले. यात प्रशांतचा मृत्यू झाला. याप्रकरणी प्रशांतचा मेव्हणा मनोहर ताबाजी डोके (३६, रा. फुरसुंगी) यांनी फुरसुंगी पोलिस ...पान ६ वर

## पत्नीची बदनामी करणाऱ्याचा साधला डाव मित्रांनीच घातले अमोलवर कुऱ्हाडीचे घाव

सांगली (कुपवाड) : क्राईम रिपोर्टर



कोणताही माणूस आपल्या पत्नीविषयी इतरांनी काही वेडेवाकडे बोललेले सहन करू शकत नाही. कुपवाड येथील प्रेम मद्रासी याची पत्नी त्याला सोडून दुसऱ्यासोबत राहत होती. त्यामुळे त्याचा मित्र अमोल नेहमी त्याची थट्टा करायचा अमोल इतक्यावरच थांबला नाही तर त्याने सर्वत्र प्रेमच्या पत्नीची आणि प्रेमची बदनामी सुरु केली. अमोल मित्र असून आपली बदनामी करतोय हे पाहून प्रेम चिडला आणि त्याने अमोलला संपवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार एके दिवशी अमोलच्या घरातच दारूची पार्टी आयोजित केली. यावेळी अमोल आणि प्रेमचे आणखी दोन मित्र पार्टीत होते. दरम्यान दारूची नाश होताच अमोल बहकला आणि प्रेम व त्याच्या पत्नी विषयी अश्लील टिप्पणी करू लागला. त्यामुळे प्रेम आणि त्याचे मित्र चिडले आणि त्यांनी अमोल याच्यावर हल्ला करून कुऱ्हाडीचे घाव घालून त्याची हत्या केली. या प्रकरणी सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.



सांगली शहरातील कुपवाड येथील रामकृष्णनगर येथे अमोल सुरेश रायते हा एकटाच राहयला आहे. त्याची आई आणि भाऊ हे दोघेजण आहिल्यानगर येथे रहायला आहेत. अमोल याची बायको ही त्याच्याशी भांडण करून आपल्या माहेरी निघून गेली होती. तो सेंट्रिंगचे काम करीत असल्याने रोज दारू पित होता. कामावरून घरी ...पान ६ वर

## दोन भावांमध्ये घरकुलाचा वाद पेटला काकाने लहान पुतण्याचा जीव घेतला



सोलापूर : क्राईम रिपोर्टर

पैसा, संपत्ती, जमीन-जायदाद यांच्यावरून सुरु झालेले वाद माणसाला रक्ताची नातीही विसरायला लावतात. काही लोक तर इतके क्रूर असतात कि ज्याच्यावर त्यांचा राग असतो त्याच्यावर जर सूड उगवता आला नाही तर त्याच्या मुलाचा जीव घ्यायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत. सोलापूरच्या अरण येथील अशाच एका घटने घरकुलावरून दोन चुलत भावांमध्ये वाद होता. यातील संदेश खंडागळे याने आपल्या चुलत भावाला धडा शिकवण्यासाठी त्याच्या 10 वर्षांच्या मुलाचे अपहरण करून त्याची हत्या केली. या प्रकरणी आरोपी संदेशला अटक करण्यात आली आहे.

अरण येथून १५ जुलै बेपत्ता रोजी झालेल्या कार्तिक खंडागळे या दहा वर्षीय शालेय विद्यार्थ्याच्या खुनाचे धागेदोरे टेंभुर्णी पोलिसांना सीसीटीव्हीच्या माध्यमातून हाती लागले. मारेकरी हा ...पान ६ वर

## शाळा संचालकांची मुजोरी सुरु आहे अजून विद्यार्थिनीच्या वडिलांचा शाळेतच केला खून

परभणी : क्राईम रिपोर्टर



आजकाल खाजगी शाळांमध्ये संचालकांची मुजोरी वाढत चालली आहे. शाळेत विद्यार्थ्यांच्या पालकांकडून डोनेशन उकळण्यापासून ते मनमानी फी वाढ करण्यापर्यंत अनेक प्रकार सुरु आहेत. या विरुद्ध पालकांनी आवाज उठवल्यास मुलाला शाळेतून काढून टाकण्याची धमकी दिली जात आहे. परभणी जिल्ह्यातील झिरो फाटा येथील एका हायटेक शाळेत एक पालक आपल्या मुलीचे ट्रान्स्फर प्रमाणपत्र मागायला गेले असता संचालकांनी त्यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस फरारी संचालक आणि त्यांच्या पत्नीला अखेर १२ दिवसांनी अटक केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.



पूर्णा तालुक्यातील झिरो फाटा येथील हायटेक निवासी शाळेत मुलीची टीसी मागण्यासाठी गेलेल्या पालक जगन्नाथ हेंडगे यांचा संस्थाचालकाने केलेल्या मारहाणीत मृत्यू झाला होता. या प्रकरणात खुनाचा गुन्हा नोंद झाल्यापासून फरार असलेल्या संस्थाचालक पती आणि पत्नी या दोघांना परभणी स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने मंगळवारी मध्यरात्री ताब्यात घेतले. तब्बल बारा दिवसांनी प्रकरणातील दोघेही आरोपी ताब्यात घेतल्याने पोलिसांनाही यश आले आहे. फरार संस्थाचालक प्रभाकर चव्हाण आणि रत्नमाला चव्हाण अशी ताब्यात घेतलेल्या गुन्ह्यातील आरोपींची नावे आहेत. झिरो फाटा येथील हायटेक निवासी शाळेमध्ये सदरील घटना १० जुलै रोजी सायंकाळी घडली होती. यानंतर पूर्णा पोलीस ...पान ६ वर

पान १ वरून...

## मनोरुग्ण तरुण घरात शिरला...

उघड्या घराच्या दरवाजातून घरात शिरलेल्या हल्लेखोराने एका तरुणावर चाकूने वार केला. यात तरुणाचा मृत्यू झाला. स्वारगेट येथील पर्वती दर्शन वसाहतीत हा प्रकार सोमवारी (दि. २१) सकाळी पावणे नऊच्या सुमारास घडला. पोलिसांनी सातारा रोडवरून हल्लेखोराला ताब्यात घेत अटक केली. दानिश सिद्दीकी (२५, रा. पर्वती दर्शन) असे खून झालेल्या दाबेली व्यावसायिक तरुणाचे नाव आहे. तर दिनेश प्रभाकर क्षीरसागर (३५, रा. यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे. दानिश सिद्दीकी हा त्याचा भाऊ व भावजयेसह सहा महिन्यांपासून राहत आहे. दानिशचा दाबेलीचा व्यवसाय आहे. पर्वती दर्शन वसाहतीत चिंचोळ्या गल्ल्या आहेत. यंग सर्कल जवळ दानिशचे घर आहे. सोमवारी सकाळी पावणे नऊच्या दानिशच्या घराचा दरवाजा उघडा होता. हल्लेखोर दिनेश त्याच्या घरात शिरला. हे पाहून दानिशने त्याला पकडले. दोघांमध्ये झटापट झाली. त्यात हल्लेखोराने चाकूने दानिशच्या गळ्यावर वार केला. त्यामुळे दानिश याचा जागीच मृत्यू झाला. हा प्रकार पाहून लोकांनी पाठलाग करत हल्लेखोराला सातारा रोडवरून पकडले. पोलिसांना याची माहिती मिळताच पर्वती पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी हल्लेखाराला ताब्यात घेतले. हल्लेखोर हा मानसिक रुग्ण असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली. दानिशला का मारले, याविषयी तो उलटसुलट उत्तरे देत असल्याचे पोलिसांनी सांगितले. पर्वती पोलिस पुढील तपास करत आहे.

## सेवालयात कर्मचाऱ्याकडूनच लैंगिक...

दोन वर्ष वास्व्यास असताना त्या दरम्यान आरोपी अमित महामुनी यांने ती अल्पवयीन एचआयव्ही बाधीत असून ती कायदेशीर रखवालीत असल्याचे माहित असताना तीच्या इच्छेविरूद्ध तीचे सोबत चार वेळा जबरी संभोग केला. तीने विरोध केला असता चापटाने मारहाण करून घटना कोणाला सांगू नको म्हणून धमकी दिली. पिडितेने सदरची घटना संस्थाचालक रवि बापटले व सेवालय अधीक्षक रचना बापटले यांना सांगितली असता त्यांनी आरोपीस सहाकार्य करून पाठीशी घालण्याचे उद्देशाने तिला कोणतेही कायदेशीर मदत केली नाही. उलट पिडीतेला दम देवून कोणाला सांगू नको नाहीतर जीवे मारण्याची धमकी दिली. पिडितीने तीचेवर झालेल्या आत्याचारा बाबत चिठ्ठी लिहून तक्रार पेटीत टाकली असता सेवालय बालगृहतील कर्मचारी पुजा वाघमारे हिने ती चिठ्ठी वाचून पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने फाडून टाकला. दरम्यानच्या काळात पिडिता आजारी पडून उलटया होत असल्याने राणी (पुर्व नाव माहित नाही) हिने तीस ममता हॉस्पिटल लातूर येथे दवाखान्यात घेऊन जावून तीचे तपासणी केली. ती चार महिन्याची गरोदर आहे माहित झाल्यावर सेवालालयाचे प्रमुख रवी बापटले व इतर कर्मचाऱ्यांनी संगनमत करून ममता हॉस्टिपल मधील डॉक्टरच्या मदतीने पिडितेचे इच्छेविरूद्ध तीचा गर्भपात केला. अशी फिर्याद पिडीतीने पोलीस स्टेशन धाराशिव येथे दिल्याने झीरो एफआयआरने दाखल होऊन हा गुन्हा औसा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. यावरून अमित महामुनी, संस्थाचालक रवि बापटले, सेवालय अधीक्षक रचना बापटल, सेवालय कर्मचारी पुजा वाघमारे, राणी (पुर्व नाव माहित नाही), ममता हॉस्पिटल मधील डॉक्टर यांच्या विरूध्द औसा पोलिस ठाण्यात गुरनं ३१२/२०२५ कलम ६४,६४(२), ६४(२)(ख), ६४(२)(ग), ६४(२)(च्), ६५,६५(१), ६८(उ),८८, ८९, ११५, ३५१(२), (३), ३(५) भारतिय न्याय संहिता सह कलम-४,६,८,१०,१२ पोस्को अंर्तगत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास औसा पोलिस ठाण्याचे सपोनि शिवशंकर मनाळे हे करीत आहेत. दरम्यान संस्थेच्या बदनामीचा डावपोलिसांनी ताब्यात घेण्यापूर्वी संस्थेचे प्रमुख रवी बापटले यांनी सांगितले, हे संपूर्ण प्रकरण संस्थेला बदनाम करण्यासाठी पुढे आणले आहे. मुळात ज्याने अत्याचार केला, अशी तक्रार आहे तो अमित महामुनी संस्थेचा कर्मचारी नाही. महामुनी आणि त्या मुलीची संस्थेमध्ये भेट झालेली नाही. यापूर्वीही एचआयव्ही बाधितांचा प्रकल्प मोडीत काढण्यासाठी मला मारहाण झाली, मोठी कटकारस्थाने झाली. मुलांना शाळांमध्ये प्रवेश नाकारला होता, अनेकांचा प्रकल्पाला विरोध होता. त्यातूनच या घटनेला कलाटणी दिली जात आहे. कोणावर अत्याचार झाला असेल तर आरोपीला कठोर शिक्षा झाली पाहिजे, आम्ही पोलिसांना सहकार्य करू अशी आपली बाजू मांडली आहे.

## विवाहितेच्या शोषणाचा खेळ खल्लास ...

तिचा विनयभंग केल्याची तक्रार दाखल केली. त्याच्या आधी ही एका महिलेने गावभाग पोलीस स्टेशन इचलकरंजी येथे लखन याने तिच्यावर लैगिक आत्याचार केल्याचा गुन्हा दाखल केला. एवढे होऊन ही तो काही कमी नव्हता. तो ही सरकारी अधिकाऱ्यांना वेठीस धरत त्याचे विरूध्द तक्रारी दाखल करीत होता. रेंदाळ ग्रामपंचायत सदस्य या नात्याने सरपंच, उपसरपंच आणि ग्रामविकास अधिकारीयाचे विरोधात निधीचा गैर वापर केल्याचा आरोप करून त्याच्या विरोधात तक्रारी दाखल केल्या होत्या. त्याला अनेक महिलात इंटरेस्ट होता. सबंधीत गरजु महिला त्याच्याकडे काम घेऊन आल्या की, तो त्याचा गैरफायदा घ्यायचा. तो ज्या मार्गाने चालला होता. त्याचा तो मार्ग सर्वस्वी चुकीचा होता. त्याच्या दादागिरीला अनेकजण कंटाळलेले होते. त्याच्या गैरवर्तणुकीचा पाढा अनेक महिलांनी पुढे येवून सोशल मिडियावर वाचला होता. तरी ही त्याच्यात काही सुधारणा होत नव्हती. कोल्हापूर राजेंद्रनगर परिसरात राहत असणारी लक्ष्मी विशाल गस्ते ही महिला गेल्या दोन वर्षापूर्वी लखन बेनाडे याच्या संपर्कात आली. तिचा नवरा विशाल गस्ते हा ही गुन्हेगारी प्रवृतीचा असल्याने त्याला एका गुन्हयात शिक्षा झाली गेल्या दोन वर्षापासून तो कोल्हापूर येथील कंळबा कारगृहात बंद होता. त्यामुळे लक्ष्मी हिला मोठया रक्कमेची गरज होती. ही गरज घेऊन ती लखन याच्याकडे आली. त्याने तिच्या गरजेचा गैरफायदा घेण्याचे ठरविले. गोड बोलत त्याने तिच्याशी जवळीक साधत अनैतिक संबंध ठेवले. थोडी फार पैशाची मदत केली. पैशाच्या मदतीनंतर त्याने तिच्याशी शारीरिक संबध ठेवले. या संबंधातून लखन याने लक्ष्मी गस्ते हिला इचलकरंजी येथे भाडयाने खोली करून दिली .त्या भाडयाच्या खोलीत तो आणि ती नवरा बायकोसारखे राहू लागले. त्यातच लखन बेनाडे याची बहिणी नीता तडाखे ही इचलकरंजी येथील आवळे गल्लीत राहत असल्याने ती ही त्याच्या घरी येवू जावू लागली. तिला त्या दोघांचे संबंध माहित होते. त्या दोघात झालेला व्यवहार माहित होता. गेल्या दोन वर्षापासून ती लखन बरोबर इचलकरंजी येथे राहत असताना त्या दोघांचे अनेक वेळा शारीरिक संबंध निर्माण झाले. या शारीरिक संबंधाच्या वेळी लखन याने तिला काही न समजता येईल अशा पध्दतीने तिचे आणि त्याच्या शारीरिक संबंधाची अश्लिल चित्रफित तयार केली होती. त्याने तिच्याकडून मनसोक्तपणे लैंगिक सुख उपभोगले होते. ती त्याला नवराच मानत असल्याने तिने त्याच्याकडे आणखी काही रक्कमेची मागणी केली.तिने त्याच्याकडे पैसे मागायला सुरूवात केल्यावर तो तिला पैसे देण्यास टाळाटाळ करू लागला. यातून त्या दोघात वाद विवाद होऊ लागला. ती पैसे मागताच तो दारूच्या नशेत येवून तिला अर्वाच्च भाषेत शिव्या देत मारहाण करू लागला. खरे तर ती त्याची बायको नव्हती तर ठेवलेली बाई असल्याने तिला कुठे ठेवायचे हे त्याला चांगले माहित होते. आणि तिला ही त्याला कसे वाकवायचे हे चांगले माहित होते. त्यातच त्याने लक्ष्मी हिच्या विरोधात बचत गटाकडून घेतलेले पैसे भरले नाहीत म्हणून पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. तो एवढयाचवरच थांबला नाही त्याने तिच्या विरोधात चांगल्या दोन तीन केसेस केल्या. त्याला ही माहित होते की, लक्ष्मी ही तयारीची आहे कधी ती आपल्यावर उलटी केस करेल आणि आपल्याला अडकवेल म्हणून तिच्यापासून मन भरल्यावर त्याने तिच्या विरोधात तक्रार करून केस घातली. खरे तर लक्ष्मी गस्ते ही त्याच्यापेक्षा जास्त तयारीची होती.तो तिला तिच्यासोबत सेक्स केल्याच्या अशिल्ल चित्रफिती व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी देत होता. तीने ही गोष्ट मनात ठेवली होती.कारण तिचा नवरा विशाल गस्ते हा अट्टल गुन्हेगारी प्रवृतीचा आहे. तो जेलमधून बाहेर आला की, लखन बेनाडे याला ठेवायचे नाही असा विचार तिने केला. ती त्याच्या धमकीला अजिबात घाबरली नाही. उलट नवरा विशाल गस्ते हा गेल्या महिनाभरापूर्वी जेलमधून बाहेर आल्यानंतर ती कोल्हापुरात गेली. ती त्याच्यासोबत झाले गेले विसरून राहू लागली. या दरम्यान तिने आपल्यासोबत घडलेला सगळा प्रकार नवरा विशाल गस्ते याला सांगितला. लखन बेनाडे याने आपल्या विरूध्द तक्रारी दाखल करून अवास्तव रक्कमेची मागणी केल्याचे सांगून त्याने त्याच्याबरोबरचे सेक्सचे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे ही तिने सांगितले.यावरु विचार करून विशाल याने लखन याच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो काही त्याच्या संपर्कात येत नव्हता. त्यातच विशाल याने लखन याची एकदा भेट घेऊन माझ्या बायकोला त्रास दिलास तर याद राख तुला जिंवत सोडणार नाही, तु किती ही तयारीचा असेना तुझी गेम करायला मला वेळ लागणार नाही तु ते व्हिडीओ मला दे नाही तर याचे गंभीर परिणाम होतील अशी धमकी दिली.विशाल गस्ते हा काय चीज आहे हे लखन बेनाडे याला माहित होते. त्यामुळे या प्रकरणातून बाहेर पडयाचे तर लक्ष्मी हिच्या विरोधातील तक्रारी माघार घ्याव्या लागतील हे त्याने ओळखले. दारूच्या नशेत त्याने दोन तीन वेळा लक्ष्मी हिची भेट भेट घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तिने ही त्याला धमकी दिली.तु आमच्या नादाला लागू नकोस नाही तर बरे होणार नाही. गेल्या दोन वर्षापासून लखन हा तिच्याबरोबरच असल्याने लक्ष्मी ही काय चीज आहे हे ही याने चांगले ओळखले होते. आपली गेम होण्या अगोदर आपण हे प्रकरण मिटवलेले बरे म्हणून तो विशाल गस्ते आणि लक्ष्मी गस्ते याच्याबरोबर तडजोडीला तयार झाला. पण इकडे विशाल गस्ते याने आपल्या पत्नीची बदनमी करणाऱ्याला सोडायचे नाही त्याची गेम करायचीच असे ठरवून त्याने आपल्या संपर्कातील तिघाजणांना लखन बेनाडे याची गेम करायची आहे असे सांगून तयारीला लागा असे सांगितले. यामध्ये विशाल गस्ते याचा तामगाव येथील पुतण्या आकाश उर्फ माया दीपक गस्ते याच्याशी संपर्क साधला. त्याने देवाळे येथील संस्कार महादेव सावर्डे आणि वाशी राजकपुर याच्या पुतळ्याजवळ राहणाऱ्या कोल्हापुर येथील अजित उदय चुडेकर याच्याशी संपर्क केला. या सर्वानी लखन याची गेम कुठे करायची त्याला कसे संपवायचे आणि त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याचा सगळा प्लॅन केला. गुरूवार दि.१० जुलै २०२५ रोजी लखन बेडाने हा कोल्हापुरातील शाहुपुरीत आला. त्याने लक्ष्मी गस्ते हिला फोन करून सांगितले की, मी कोल्हापुरात आलो आहे, मी तुझ्या विरोधात दिलेल्या सर्व तक्रारी माघारी घेतो तु माझ्या बरोबर चल असे तिला सांगितले आणि तिला सायबर चौकात बोलावून घेतले. लखन बेनाडे हा कोल्हापुरात आल्याचे लक्ष्मी हिने आपला नवरा विशाल, पुतण्या आकाश आणि त्याच्या साथीदारांना सांगितले. लागलीच ते सायबर चौकात कार घेऊन आले. विशाल गस्ते आणि लक्ष्मी गस्ते यांना बघून आपल्या दुचाकीवरून लखन हा सायबर चौकातून पळून जावू लागला. तो पळून जात असताना त्याचा पाठलाग त्यांनी केला. विशाल गस्ते हे कारमधून त्याचा पाठलाग करीत असताना त्यांनी लखन याच्या दुचाकीला शाहू टोल नाक्याजवळ गाठले. त्या आडविले असता तो परत पळून जाण्याच्या तयारीत असताना विशाल गस्ते आणि त्याच्या साथीदारांनी त्याला आपल्या कारमध्ये जबरदस्तीने कोंबले. लखन याला कारमध्ये घेतल्यावर आकाश गस्ते याने त्याच्या गळ्याला चॉपर लावला. त्याला गप्प राहण्यास सांगितले त्याला घेऊन ते पुणे बंगळूरू हायवेवरून निघाले. निपाणीच्या पुढे गेल्यानंतर त्यांनी कार सर्व्हिस रस्त्याला घेतली. कारमध्येच त्यांनी त्याच्या मानेवर, पोटावर, पायावर, चॉपरने, तलवारीने वार करून त्याला मारून टाकले.त्याला त्यांनी ओरडण्याची संधी ही दिली नाही. त्यानंतर त्यांनी त्याच्या शरीराचे दोन तुकडे केले. शीर आणि धड बाजुला करून ते वेगवेगळे केले. ते दोन पोत्यात भरले. पुढे तशीच कार संश्केश्वरला हायवेने घेतले. हिरण्यकेशी नदीवर कार थांबवली. शीर आणि धडा वेगळे पोते त्यांनी नदीत टाकून तेथून परत माघारी कोल्हापुरला फिरले. इकडे १० जुलैला गेलेला भाऊ दुसऱ्या दिवशी ही परत घराकडे आला नाही म्हणून इचलकरंजी येथील त्याची बहिण नीता तडाखे हिने शिवाजीनगर आणि गावभाग इचलकरंजी पोलीस स्टेशन गाठून आपला भाऊ लखन बेनाडे डा बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवून त्याला बेपत्ता करण्यामागे त्याने ठेवलेली बाई लक्ष्मी गस्ते हिच्यावर संशय व्यक्त केला. या घटनेची गंभीर दखल घेत पोलीसांनी तपास चालविला कोल्हापुर येथील लक्ष्मी गस्ते ही बेपत्ता होती. तिचा आणि तिच्या घरचा लोकांचा कोणताच ठाव ठिकाणा लागत नव्हता.या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही करीत होते. या घटनेतील संशयीत आरोपी आकाश उर्फ माया दीपक गस्ते हा तामगाव ता.करवीर परिसरात राहत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषनच्या पथकाला मिळाली. पोलीसांनी सापळा रचून आकाश उर्फ माया दीपक गस्ते याला ताब्यात घेतल्यानंतर लखन बेनाडे याचा खून करून त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून तुकडे केलेले पोते कर्नाटकातील संकेश्वर नजीक हिरण्यकेशी नदीत टाकल्याची माहिती त्याने पोलीसांना दिली. त्याने या घटनेतील आपल्या इतर साथीदारांची नावे ही पोलीसांना सांगितल्याने तातडीने हालचाल करीत पोलीसांनी या घटनेतील मुख्य संशयीत विशाल गस्ते, त्याची पत्नी लक्ष्मी गस्ते, संस्कार सावर्डे, अजित चुडेकर यांना ही ताब्यात घेतले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी त्यांना राजारामपुरी पोलीसाच्या ताब्यात दिले. विशाल गस्ते, लक्ष्मी गस्ते आणि इतरांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांच्या एका पथकाने त्यांना घेऊन घटनास्थळ आणि हिरण्यकेशी नदीत टाकलेले पोते शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु हल्ली पाऊस जास्त झाल्याने नदीला ही पाणी मोठया प्रमाणात असल्याने पोलीसांना ती दोन्ही पोते मिळू शकले नाही. राजारामपुरी पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत लखन बेनाडे याची बहिण नीता तडाखे रा.आवळे गल्ली इचलकरंजी हिच्याकडून घेतली. तिने दिलेल्या फिर्यादीप्रमाणे राजारामपुरी पोलीसांनी लखन आण्णासो बेनाडे (वय ३२) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी विशाल गस्ते, त्याची पत्नी लक्ष्मी गस्ते,पुतण्या आकाश उर्फ माया गस्ते, संस्कार सावर्डे, अजित चुडेकर याच्या विरोधात वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे दाखल करून त्यांना कोल्हापूर येथील प्रथम वर्ग न्यायालयात शनिवार दि.१९ जुलै २०२५ रोजी उभे केले. मा.न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान राजारामपुरी पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चॉपर, तलवार, एडका आणि गुन्हयात वापरलेली कार गाडी जप्त केली. अनैतिक संबंध जेवढे दुरून चांगले वाटतात तेवढेच ते बाहेरून वाईट असतात.या संबंधातील महिला ही जर उलटी फिरली की, ती बरोबर डाव साधते आर्थिक व्यवहार आणि बाईचा नाद माणसाला बरबाद करतो हेच या घटनेवरून दिसून येते. या घटनेचा पुढील तपास राजारामपुरी पोलीस करीत आहेत.

## दोघांच्या हातून भयंकर गुन्हा घडला...

पैसे मिळवण्याचा प्रयत्न करतात, पण गुन्हेगारीच्या वाटेवर तुरूंगाशिवाय काहीच मिळत नाही. धुळे जिल्ह्यात अशीच एक दुर्दैवी घटना घडली. दोन मित्रातील एकाच्या वडीलांना कॅन्सरने ग्रासले होते. त्यांच्यावर उपचारासाठी त्याला पैशाची गरज होती, तर दुसऱ्याला घर बांधण्यासाठी पैसे हवे होते, पण कुठूनच पैसे मिळत नव्हते म्हणून त्यांनी चोरी करण्याचे ठरवले. एका व्यापाऱ्याच्या घरात ते चोरी करण्यासाठी घुसले, पण त्या व्यापाऱ्याला जाग आली. आता आपण बिंग फुटणार या भीतीने त्या दोघांनी व्यापाऱ्यावर चाकूने हल्ला केला. व्यापारी त्यात मृत्यूमुखी पडला. चोरी करण्यासाठी गेलेल्या दोघांच्या हातून खून झाला. आता ते गजाआड झाले आहेत. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील पिळोदा या विकसनशील गावामध्ये आकाश पवन ईच्छे नावाचा तरूण आपल्या कुटुंबीयांसमवेत रहातो. या परिसरात सर्व सुशिक्षीत, सुसंस्कृत आणि एकमेकांच्या मदतीला धावून जाणारी मंडळी रहातात. आकाश ईच्छे आणि त्याचे कुटुंबीयसुद्धा परिसरातील नागरिकांशी मिळून मिसळून रहातात. आकाश ईच्छे या तरूणाच्या घरची आर्थिक स्थिती तशी जेमतेम. मिळणाऱ्या उत्पन्नात मुलभूत गरजा भागवत जगणारे हे कुटुंब अचानक संकटात आले. आकाशचे वडील अचानक आजारी पडले. त्यांच्या जेवणावर, शारिरीक हालचालीवर मर्यादा आल्या. परिस्थिती सक्षम नसतांनाही उसनवारीने पवन यांची डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ती तपासणी करून घेतली, त्यासाठी बराच खर्चही झाला. पवन यांना कर्करोगाने ग्रासल्याचे निष्पन्न झाले. आता मात्र ऐपत नसतांना उपचार कसा करायचा असा यक्ष प्रश्न ईच्छे कुटुंबीयांसमोर उभा राहिला. याच परिसरात अशोक भास्कर चव्हाण नावाचा कोळी समाजातील तरूण रहातो. तो आकाशचा जीवलग मित्र आहे. आर्थिक अडचणी असल्याने तो आपल्या मित्राची म्हणजेच आकाश ईच्छे याची मदत घेवून बँकेमध्ये कर्ज मिळते का या प्रयत्नात होता. अशोक चव्हाणला स्वतःचे घर बांधण्यासाठी पैशाची गरज होती, त्यासाठी तो बँकेचे उंबरठे झिजवत होता. त्याच्यासोबत आकाशही असायचा. आवश्यक ते दस्तऐवज अशोक याच्याकडे नसल्याने बँकांकडून त्याला कर्ज मिळत नव्हते. घर बांधण्यासाठी पैसे मिळत नाहीत म्हणून अशोक चिंतेत होता, तर वडीलांना औषधोपचार करायला पैसे नव्हते म्हणून आकाश ईच्छे चिंतेत होता. आकाश ईच्छे आणि अशोक चव्हाण ज्या परिसरात रहातात त्याच ठिकाणी गोपालसिंग बाबूसिंग परदेशी हे किराणा दुकानदार रहातात. व्यवसायातल्या चिकाटीमुळे आणि दिलेल्या योगदानामुळे गोपालसिंग यांची आर्थिक परिस्थिती संपन्न होती. काही दिवसांपूर्वी आर्थिकदृष्ट्या सुसंपन्न असलेल्या गोपालसिंग याची पत्नी अचानक आजारी पडली. शिरपूर तालुक्यातील निष्णात डॉक्टरांकरवी औषधोपचार चालू असतांनाही गोपालसिंग परदेशी यांच्या पत्नीच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती, म्हणून गोपालसिंग यांच्या सासरकडची मंडळी त्याच्या पत्नीला आपल्या घरी घेवून गेले. पत्नी उपचारार्थ माहेरी गेल्याने काही दिवसांपासून गोपालसिंग हे घरी एकटेच होते. आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या गोपालसिंग यांच्या सुसंपन्न घरावर आकाश आणि अशोक या दोघांची नजर पडली. दोघांनाही वेगवेगळ्या कारणासाठी पैशांची नितांत गरज होती. विविध प्रकारचे प्रयत्न करूनही त्यांना आवश्यक पैसा उपलब्ध होत नव्हता, त्यामुळे आकाश आणि अशोक दोघेही परेशान होते. गोपालसिंग परदेशी यांच्या घरी रोख रक्कम तर असतेच शिवाय दागदागिनेही भरपूर असल्याचे आकाश आणि अशोकला ज्ञात होते. गरजेपोटी आकाश आणि आकाश या दोन मित्रांची नियत बिघडली. सरळ मार्गाने पैसे उपलब्ध होत नाही म्हणून दोघा मित्रांनी वाकडा मार्ग अनुसरण्याचा निर्णय घेतला. एकाच परिसरात रहाणारे आकाश ईच्छे आणि अशोक चव्हाण (कोळी) हे क्वचित प्रसंगी गोपालसिंगच्या दुकानावर व घरी जात असत, पण गेल्या काही दिवसांपासून कारण काढून गोपालसिंग परदेशी याच्या दुकानावर आणि घरी जावू लागले. रेकी करण्यासाठीच ते दोघे जात असत. गोपालसिंग परदेशी हे पत्नी माहेरी गेल्याने एकटेच झोपतात याची खात्री करून घेतल्यानंतर रात्री त्यांच्या घरात सहजगत्या प्रवेश कसा घेता येईल याची माहिती आकाश याने मिळवली आणि मंगळवार दि. १ जुलै २०२५ रोजी गोपालसिंग परदेशी यांच्या घरी चोरी करण्याचे त्यांनी ठरवले. त्यादिवशी गोपालसिंग हे आपल्या घरी एकटेच झोपले आहेत याची खात्री करून आकाश आणि अशोक यांनी दि. १ जुलै रोजी रात्री १२ वाजता गोपालसिंग यांच्या घराच्या गच्चीवरून घरात प्रवेश मिळवला. अपेक्षेप्रमाणे गोपालसिंग हे आपल्या शयनकक्षात गाढ झोपले होते. एका खोलीतील मंद प्रकाशाव्यतिरिक्त इतर खोल्यामध्ये अंधार होता. या अंधारातून माग काढत आकाश आणि अशोक हे दोघे सावध पावले टाकत पैसे आणि सोन्यांच्या दागिन्यावर डल्ला मारण्यासाठी पुढे सरकत होते. अचानक अंधारात आकाशचा टेबलावर ठेवलेल्या पाण्याच्या तांब्याला धक्का लागला आणि तांब्या जमिनीवर पडला. जमिनीवर पडलेल्या तांब्याच्या आवाजाने गाढ झोपत असलेल्या गोपालसिंग यांना जाग आली. त्यांनी घरातील लाईट ऑन करून आवाजाच्या दिशेने पाहिले. तर त्यांना समोरच आकाश ईच्छे आणि अशोक चव्हाण हे दोघे दिसले. त्यांनी डोळे चोळतच त्या दोघांना 'तुम्ही माझ्या घरात कसे?' असे म्हणताच आकाश आणि अशोक हे घाबरले. आपले बिंग फुटणार व बदनामी होणार असा विचार त्यांच्या मनात आला. सावधानता म्हणून आकाशने आपल्यासोबत आणलेला सुरा खिशातून बाहेर काढला आणि त्याने गोपालसिंग याच्यावर सपासप वार केले. बेसावध गोपालसिंग परदेशी गंभीररित्या जखमी झाले. त्यांच्या शरीरातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या आणि थोड्याच वेळात ते निपचित पडले. खाली पडतांना ते मोठ्याने ओरडल्याने परिसरातील लोक येणार आणि आपण रंगेहात सापडणार म्हणून आकाश आणि अशोक यांनी घटनास्थळावरून धूम ठोकली. दरम्यान प्राणघातक हल्ला होतांना गोपालसिंग परदेशी ओरडल्याने परिसरातील लोकांना जाग आली. लोक आवाजाच्या दिशेने गोपालसिंग यांच्या घराकडे आले असता त्यांना गोपालसिंग हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसून आले. या घटनेची माहिती लोकांनी तात्काळ थाळनेर पोलीस स्टेशनला कळवताच सहाय्यक पोलीस निरीक्षक शत्रुघ्न पाटील, उपनिरीक्षक समाधान भाटेवाल, हेडकॉन्टेबल दिलीप पवार, संजय धनगर, विजय ठाकूर, रूपेश गांगुर्डे, राजेंद्र भिल, कॉन्स्टेबल उमाकांत वाघ, किरण सोनावणे, धनराज मालचे, मुकेश पवार, रविंद्र मोरे, आकाश साळुंखे, मनोज कोळी आदींनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह विच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल गोसावी यांना देण्यात आली. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक शत्रुघ्न पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने घटनेतील संशयितांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता गेल्या दोन-तीन दिवसांपासून आकाश पवन ईच्छे आणि अशोक भास्कर चव्हाण (कोळी) या परिसरातील दोघा तरूणांचे गोपालसिंग परदेशी यांच्याकडे येणे-जाणे वाढले होते असा धागा मिळाला. त्याआधारे त्यांचा शोध घेता ते दोघेही घरी नसल्याचे समजले. ते कोठे गेले आहेत ? हेही घरच्यांना सांगता आले नाही. यावरून तपास अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा त्या दोघांवरचा संशय बळावला. आकाश आणि अशोक हे थाळनेर पोलिसांच्या तपास पथकाच्या नजरेस आल्याने पोलिसांनी त्यांच्यासंबंधी माहिती काढण्यास सुरूवात केली, तेंव्हा पोलिसांना समजून आले की आकाश आणि अशोक हे दोघे एका मोटरसायकलने नाशिकच्या दिशने गेले आहेत. माहितीची खात्री होताच सहाय्यक पोलीस निरीक्षक शत्रुघ्न पाटील यांनी नाशिक जिल्हा पोलीस यंत्रणेला सतर्क केले. नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस यंत्रणेने दिलेल्या सुचनेप्रमाणे गस्त पथके सतर्क झाली होती. देवळा पोलीस स्टेशनच्या गस्त पथकाला देवळा शहरात दोन तरूण आश्रय शोधत असतांना संशय आला. त्या गस्त पथकाने त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरूवातीला ते आपण त्या गावचे नाहीतच असा पवित्रा घेत होते. देवळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहते व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार केला असता त्यांनी आपली ओळख देत पिळोदा येथील गोपालसिंग बाबूसिंग परदेशी यांचा खून केल्याचे कबुल केले. त्यानंतर देवळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी थाळनेरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शत्रुघ्न पाटील यांना याबाबत माहिती कळवली, तेंव्हा सहाय्यक पोलीस निरीक्षक शत्रुघ्न पाटील यांनी पोलीस पथक पाठवून आकाश पवन ईच्छे आणि अशोक भास्कर चव्हाण (कोळी) यांना थाळनेर पोलीस स्टेशनला आणले. या दोघांकडे स्वतंत्र चौकशी केली असता आकाश ईच्छे याने आपल्या कॅन्सरग्रस्त वडीलांच्या औषधोपचारासाठी आणि अशोक चव्हाण (कोळी) याने आपले घर बांधण्यासाठी गोपालसिंग परदेशी हे घरी एकटेच असल्याची संधी साधून चोरी करण्याचा प्रयत्न केला, पण दरम्यान गोपालसिंग यांना झोपेतून जाग आली. त्यांनी आम्हाला ओळखले. आपले बिंग फुटेल या भीतीने आम्ही पुरावा नष्ट करण्यासाठी गोपालसिंग परदेशी यांच्यावर प्राणघातक हल्ला केला अशी कबुली दिली. गुन्हा उकल झाल्यावर याची माहिती वरीष्ठांना देण्यात आली. गोपालसिंग परदेशी यांचा पुतण्या संजयसिंग भिकनसिंग परदेशी यांनी आकाश पवन ईच्छे आणि अशोक भास्कर चव्हाण (कोळी) यांच्याविरोधात थाळनेर पोलीस स्टेशनला रितसर फिर्याद दाखल केली. या फिर्यादीच्या अनुषंगाने थाळनेर पोलिसांनी गुन्हा रजि. नं. ९४/२०२५ नुसार भारतीय न्यायसंहिता कलम १०३ (१), ३३३ अन्वये गुन्हा दाखल केला आणि दोघांना गजाआड केले.

## शरीरसुखासाठी तिने शेजाऱ्याला...

पुढील कारवाई करत अवघ्या २४ तासांत आरोपींना पुण्याच्या हडपसर येथून अटक केली. या यशस्वी कारवाईमुळे खुनाचा उलगडा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर करून सात दिवसांची पोलीस कोठडी मिळवली असून, या प्रकरणातील पुढील तपास वेगाने सुरू होणार आहे. आरोपी पुण्याच्या हडपसर येथे फिरत होते. नालासोपाऱ्यात एका महिलेने प्रियकराच्या मदतीने आपल्या पतीची हत्या केल्याचे धक्कादायक प्रकरण समोर होते. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मृतदेह घरातच गाडून त्यावर टाईल्स बसवल्या होत्या. सोमवारी पेल्हार पोलिसांनी तहसिलदारांच्या उपस्थितीमध्ये टाईल्स खणून मृतदेह बाहेर काढला होता. त्याअगोदर पत्नी आणि प्रियकर घरातून फरार झाले होते. नालासोपारा पूर्वेतील धानिव बाग येथील राशिद कंपाऊंड, ओम साई वेल्फेअर सोसायटीत विजय चौहान (३२) हा आपली पत्नी चमन देवी चौहान (२८) तीन वर्षाच्या मुलीसोबत राहत होता. तो मजुरीचे काम करत होता. मागील १५ दिवसांपासून विजय चौहान अचानक बेपत्ता झाला होता. विजयचे दोन भाऊ बिलालपाडा येथे राहतात. त्यांनी विजयची शोधाशोध सुरू केली होती. पण काहीच माहिती मिळाली नव्हती. विजय कामानिमित्ताने बाहेर गेला आहे, असे त्याची पत्नी चमन देवी त्यांना वारंवार सांगत होती. विजय चौहान बेपत्ता असताना दोन दिवसांपूर्वी त्याची पत्नी चमन देवी ही शेजारी राहणाऱ्या मोनू शर्मा (२०) याच्यासोबत पळून गेली. चमन देवी आणि मोनू शर्मा यांच्यात मागील काही महिन्यांपासून प्रेमसंबंध असल्याचे स्थानिकांनी सांगितले. दरम्यान, सोमवारी सकाळी विजय चौहानचे दोघे भाऊ त्याच्या घरी गेले असता त्यांना जमिनीवरील काही टाईल्स नव्याने बसवलेले दिसले. संशय आल्याने त्यांनी त्या उकरून पाहिल्या असता आतून एक बनियान आढळला आणि दुर्गंधी येऊ लागली. यामुळे त्यांना हत्या करून मृतदेह जमिनीत गाडल्याचा संशय आला आणि त्यांनी तात्काळ पेल्हार पोलिसांना बोलावले. पोलिसांनी तपास सुरू केला आणि मृतदेह बाहेर काढण्यासाठी तहसीलदारांची मदत मागितली. मात्र तहसीलदार पालघर येथे एका कार्यक्रमात उपस्थित असल्याने ते संध्याकाळी ५ वाजता घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर पोलिसांनी उत्खनन करून सुमारे ६ वाजता मृतदेह बाहेर काढला आणि शवविच्छेदनासाठी मुंबईच्या जेजे रुग्णालयात तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. दरम्यान आरोपी मोनू शर्मा हा उच्चशिक्षित असून तो त्याच ठिकाणच्या बाजूच्या रूममध्ये राहण्यासाठी होता. त्यामुळे त्यांची ओळख देखील त्याच ठिकाणी झाली होती. मृतक विजय चौहान यांच्या खात्यावर लाखोची रक्कम आली होती. ही रक्कम विमा पॉलिसीतून आली असल्याची माहिती समोर आली आहे.

# फडणवीस सरकारच्या जनसुरक्षा विधेयकाविरुद्ध काँग्रेस पक्षाची उग्र निदर्शने







## जनसुरक्षा कायद्याची केली होळी

**वसई : वार्ताहर**

लोकशाहीसाठी विघातक घातक असा जन सुरक्षा कायदा या पावसाळी अधिवेशनात फडणवीस सरकारने मंजूर केला. हा कायदा नसून चक्क लोकशाहीची पायमल्ली आहे. सामान्य माणूस आपली लढाई लढण्यासाठी तसेच सरकारच्या चुकीच्या धोरणाला विरोध करण्यासाठी रस्त्यावर उतरू शकणार नाही. विचारवंत साहित्यिक पत्रकार विद्यार्थी कर्मचारी मजूर फेरीवाले अनेक संघटना संपवण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध सुद्धा आपल्याला आवाज उठवण्याची मुभा राहणार नाही. या सरकारच्या अनेक चुकीच्या धोरणामुळे आधीच महाराष्ट्र अधोगतीला गेला आहे. या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे राक्षसी अधिकार सरकारकडे असणार आहेत. आपल्याला आपलं घर सुद्धा आपण गमावू शकतो व आपण त्याविरुद्ध आवाज उठवल्यास थेट तुरुंगात डांबण्याची सुविधा या कायद्याने सरकारला दिली आहे. कळीचा मुद्दा आहे की त्याविरुद्ध जिल्हा सत्र न्यायालयात सर्वसामान्य माणूस अपील करू शकत नाही, तर लाखो रुपये खर्च करून हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्टात सर्वसामान्यांना अपील करावे लागेल जे आपल्या जनतेला परवडणार नाही. श्रीमंताच्या अधीन राहून मोजक्याच उद्योगपत्यांच्या भल्यासाठी, त्यांच्या धनरक्षणासाठी आणि जबरदस्तीने जमिनी बळकवण्यासाठी हा कायदा प्रभावीपणे जनतेविरुद्ध वापरण्यात येणार आहे असे दिनेश कांबळे यांनी आपल्या भाषणात सांगितले. उन्नत हत्तीप्रमाणे सत्तेचा माज या सत्ताधाऱ्यांना झाला असून ते जनतेला पायाखाली तुडवत चालले आहेत. हा कायदा जनतेशी सुरक्षा करण्यासाठी नाही तर यांच्या नतदृष्ट आमदार व मंत्र्यांना वाचवण्यासाठी आहे, आमदार निवासाच्या कॅन्टीनमध्ये खराब जेवणासाठी कर्मचाऱ्यांना ठोषाबुक्याने मारतात, ऐन विधिमंडळात लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात मंत्री महोदय रम्मी खेळतात, विधिमंडळाच्या आवारात मारामारी करणारे यांचेच आमदार, यांच्याच मंत्र्यांचे लेडीज बार, बॅगा भरून हॉटेलच्या रूमवर अफाट धनसंपत्ती मध्ये मदमस्त मंत्री यांना वाचवण्यासाठी विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी जनतेला उत्तर न देण्यासाठी हा जुलमी कायदा फडणवीस सरकारने मंजूर केला आहे, पण हा कायदा आम्ही मोडून काढू, वेळ आली तर जनतेसाठी ह्या राज्यासाठी बलिदान देऊ असे कॅप्टन निलेश पेंढारी यांनी आपल्या भाषणात म्हटले. ह्या कायद्याला हजारो नागरिकांनी हरकती नोंदवल्या असताना जनसुनावणी न घेता सरकारने जन सुरक्षा कायदा संमत करणे ही संविधानाची पायमल्ली करणारा निर्णय आहे आणि विद्यार्थ्यांना, कामगारांना, महिलांना आणि सर्वसामान्य नागरिकांना संविधानिक अधिकाराने आंदोलन करण्यास पायबंद घालणारा हा कायदा आहे असे डॉक्टर दिनेश कांबळे ह्यांनी आपले विचार मांडताना सांगून तीव्र शब्दात कायद्याला विरोध करून वेळ पडली तर सुप्रीम कोर्टाचा आधार घेण्याचा निर्धार विशद केला. हा कायदा म्हणजे राजकीय मुस्काटदावी असून, लोकशाही मार्गाने चाललेली जनतेची चळवळ हे सरकार ह्या मग्रूर कायद्याने दाबू पाहत आहे, काँग्रेस पक्ष शेवटच्या माणसासाठी शेवटच्या क्षणापर्यंत लढणार आणि हा कायदा आम्ही इकडून फेकणार असे ओनील अल्मेडा यांनी आपल्या भाषणात म्हटले. छत्रपती शिवाजी महाराज भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच भारतीय राज्यघटनेचे पूजन करून या उग्र निदर्शनास सुरुवात झाली.

आंबेडकरी चळवळीचे नेते दत्ता धुळे, ॲड. गिरीश दिवाणजी यांनी आंदोलनाला संबोधित केले. शेकडो कार्यकर्ते व सामान्यांच्या गर्दीमध्ये जन सुरक्षा कायद्याची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. यावेळी विशेष करून उपस्थित संघटन सरचिटणीस किरण शिंदे, ब्लॉक अध्यक्ष विल्फ्रेड डिसोजा, नितीन उबाळे संदीप कनोजिया, रामदास वाघमारे, सलीम खिमानी, राकेश गोंसाळवेस, श्रीमती राधा आयर, अश्रफ अली, रवी भूषण, आलम अंसारी, सज्जाद अंसारी चौधरी, मेहफूस शेख, निखिलेश उपाध्याय यांच्यासह प्रभाग ब मधील महिला पदाधिकारी आणि अनेक कांग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष ओनील अल्मेडा व संघटनेचे जिल्हा सरचिटणीस किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाने नियोजनाखाली संदीप कनोजिया व रामदास वाघमारे यांनी हे आंदोलन यशस्वी होण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# मुंबई वडोदरा महामार्गाला भिवंडीतील लामज सुपेगाव येथील जोडणीसाठी केंद्र सरकारकडून १६० कोटींची मंजुरी

### खासदार बाळ्या मामा यांच्या प्रयत्नांना यश



**भिवंडी : वार्ताहर**

केंद्रशासनाचा महत्वाचा प्रकल्प असलेला मुंबई वडोदरा महामार्ग भिवंडी वाडा रस्त्यामधून जात असून भिवंडीतील लामज सुपेगाव येथे या महामार्गाला जोड देण्याची मागणी भिवंडी लोकसभेचे खा. सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती.खा.म्हात्रे यांच्या मागणीची दखल केंद्रीय मंत्री गडकरी यांनी घेतली असून या जोडणी प्रकल्पासाठी सुमारे १६० कोटी रुपयांची निधी मंजूर करण्यात आला असून प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून लवकरच या कामाला सुरुवात होणार आहे. यासंदर्भात खा.बाळ्या मामा यांनी बुधवारी मंत्री गडकरी यांची दिल्ली येथे भेट घेतली. भिवंडी-वाडा हा राष्ट्रीय महामार्ग औद्योगिक, व्यापारी आणि शेती क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा असून या महामार्गावरून मुंबई वडोदरा महामार्ग जाऊनही या मार्गावर थेट प्रवेश नसल्याने प्रवाशांना वाहतूक वळसा घालून तब्बल १८ किमीचा अतिरिक्त प्रवास करावा लागत आहे, यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक नुकसान होणार असून स्थानिक नागरिक, व्यापारी, उद्योजक आणि शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे भिवंडी-वाडा मार्गावर लामज सुपेगाव गावाजवळून मुंबई वडोदरा महामार्गावर थेट प्रवेशद्वार निर्माण करावे, रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व दुरुस्ती करून अत्याधुनिक वाहतूक सुविधा निर्माण करावी. नवीन इंटरचेंज तयार करून भिवंडी-वाडा मार्ग थेट एक्स्प्रेसवेने जोडावा, यामुळे वाहतूक वेगवान होईल आणि स्थानिकांसाठी सहज उपलब्धता निर्माण होणार असून त्यामुळे भिवंडी-वाडा औद्योगिक पट्टा वेगाने विकसित होऊन ५ हजारहून अधिक नवीन रोजगार संधी निर्माण होऊन स्थानिक तरुण आणि कामगारांना प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे. येथील नागरिक, शेतकरी व प्रवाशांसह भिवंडीच्या विकासासाठी हा प्रकल्प महत्वाचा दुवा ठरणार असून या प्रकल्पामुळे भिवंडी-वाडा परिसराचा विकास झपाट्याने होणार असल्याने आपण या प्रकल्पासाठी यापूर्वीही मंत्री गडकरी साहेबांची भेट घेतली असून नुकताच झालेल्या भेटीत या जोडणी बाबत केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतली असून त्यासाठी सुमारे १६० कोटींचा निधी देखील मंजूर करण्यात आला असून प्रस्ताव अंतिम टप्यात असल्याची ग्वाही आपल्याला मंत्री गडकरींनी दिली आहे अशी प्रतिक्रिया खासदार बाळ्या मामा यांनी दिली आहे.

# वसई कोळीवाड्यात भंगारवाल्याकडे वसई विरार महानगरपालिकेच्या औषधांचा ढिग!

**वसई : वार्ताहर**



वसई विरार शहर पालिकेच्या आरोग्य विभागाला बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसापूर्वी उघडकीस आला होता. अन्न, औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या सातिवली येथील माता बाल संगोपन रुग्णालयातील औषधांची तपासणी केली असता बनावट औषध गोळ्यांचा पुरवठा केला जात होता. या पार्श्वभूमीवर अन्य एका प्रकरणात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या 'आय' प्रभाग समितीत वसई कोळीवाडा येथे एका भंगार गोदामात पालिकेच्या आरोग्य विभागातील सलाईन व तत्सम औषधांचा ढिग सापडल्याने पालिका प्रशासनाचा कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. वसई विरार महापालिकेच्या 'आय' प्रभाग समिती मधील कोळीवाडा मस्जिद मागे एका भंगार गोदामात आरोग्य विभागाला देण्यात येणाऱ्या सलाईन व इतर औषधे सापडली आहेत. पालिकेच्या आरोग्य विभागातुन ही औषधे भंगारात पोहोचली कशी? हे कोडं आहे. महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सदरची औषधे परस्पर भंगार व्यावसायिकाला विकून त्यातून नफा मिळवल्याचे स्पष्ट आहे. याची उच्चस्तरीय चौकशी होऊन संबंधितां विरोधात कारवाई होणे अपेक्षित आहे. महापालिका प्रशासनात एकीकडे बनावट औषधे वितरित करून नागरिकांच्या जीवाशी खेळले जाते तर दुसरीकडे नागरिकांच्या कराच्या पैशातून आलेली औषधे परस्पर बाहेर विक्री करून गब्बर होणारे रॅकेट सक्रिय असल्याचा संशय आहे. आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रशांत जाधव यांना संपूर्ण प्रकाराची माहिती दिली असता, सदरच्या सापडलेल्या औषधा बाबत माहिती घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. औषधे कुठली आहेत तसेच कुठून आली? याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्यात येईल अशी माहिती दिली आहे.

# प्राचार्य डी.एन.केंद्रे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**लातूर : वार्ताहर**




राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी.एन.केंद्रे यांचा ६९वा वाढदिवस गुरुवारी राजमाता जिजामाता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, एमसीव्हीसी, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज, तुळजाभवानी प्राथमिक, माध्यमिक व इंग्लिश स्कूल आणि संगमेश्वर विद्यामंदिरच्या संयुक्त विद्यमाने विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यानिमित्त लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीरच्या वतीने राजमाता जिजामाता विद्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर पार पडले. संत भगवानबाबा बॉईज हॉस्टेलच्या वतीने संचालक गोरख दराडे यांच्या मार्गदर्शनात सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. विजेत्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ११००, ५०१ व २५१ रुपये पारितोषिक वितरण करण्यात आले. संगमेश्वर विद्यामंदिरच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर पार पडले. तुळजाभवानी विद्यालयाच्या वतीने क्रिकेट स्पर्धा घेण्यात आली. विजेत्या संघास बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच संकुलातील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, वृक्षारोपण आदी उपक्रम राबविण्यात आले. प्रारंभी संकुलाच्यावतीने केक कापून प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्ष के. ए. जायेभाये होत्या. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन मदन धुमाळ यांनी केले. यावेळी संकुलातील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. विभागीय शिक्षण मंडळाचे चेअरमन सुधाकर तेलंग, शिक्षण उपसंचालक दत्तात्रय मठपती, सहायक शिक्षण उपसंचालक संजय पंचगल्ले, माजी आमदार वैजनाथ शिंदे, गणपतराव बाजुळगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मकरंद सावे, जिल्हा कार्याध्यक्ष बबन भोसले, 'आरसीसी'चे डॉ. धर्मराज जांभळे, लक्ष्मण मोटेगावकर, प्रमोद घुगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वाढदिवसानिमित्त प्राचार्य डी. एन. केंद्रे यांना शुभेच्छा दिल्या.

## चिखले गावात बिबट्याचा वावर

**डहाणू : वार्ताहर**



डहाणू तालुक्यात बिबट्याच्या वाढत्या वावराने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीला नरपड गावात गायीच्या वासराला लक्ष्य केल्यानंतर, सोमवार २१ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास चिखले गावातील काकडपाडा येथील आदिवासी वस्तीत बिबट्याने शिरकाव करून दोन बकऱ्यांना ठार केले आहे. वन विभागाने घटनेची दखल घेतली असून, शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यासोबतच बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. सोमवारी चिखले येथील काकडपाडा येथे रेल्वे उड्डाणपूलानजीकच्या आदिवासी वस्तीत रवी रामदास खाचे यांच्या गोठ्यातील बकऱ्यांवर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात दोन बकऱ्या ठार झाल्या असून एक बकरी गोठ्यात मृतावस्थेत आढळली, तर दुसरी बिबट्या घेऊन गेल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच, डहाणूच्या सहायक वन संरक्षक प्रियंका पाटील आणि बोर्डी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनेचा पंचनामा केला. नरपड गावात बिबट्याने गोठ्यात बांधलेल्या एका वासराला ठार केले होते. या घटनेनंतर काही दिवसांनी, लगतच्या चिखले गावात काकडपाडा आणि घोलवड गावच्या सीमेलगतच्या विजयवाडी येथेही बिबट्याचा वावर आढळून आला होता. वन विभागाने याची पुष्टी केल्यानंतर, विजयवाडी येथे एक ट्रॅप कॅमेरा बसवला असून काकडपाडा येथे चार कॅमेरे लावण्यात आले आहेत. वन विभागाकडून नागरिकांमध्ये जनजागृती आणि भरारी पथकाकडून परिसरात गस्त घालण्यात येत आहे. मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी वन विभागाने नरपड, चिखले आणि घोलवड या तिन्ही ठिकाणी जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. बिबट्याच्या सततच्या हल्ल्यांमुळे स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून बिबट्याचा लवकरात लवकर पकडण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## भिवंडीत संततधार, कामवरी नदीपात्र दुधडी भरून वाहण्यास सुरुवात

**भिवंडी : वार्ताहर**

हवामान खात्याने ठाणे जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट दिल्यानंतर काल मध्यरात्री पासूनच पावसाची सुरुवात ठाणे जिल्ह्यात झालेली आहे. परंतु भिवंडी शहर व ग्रामीण भागात मध्यरात्रीपासून पावसाची संतधर सुरू असली तरीसुद्धा पावसाचा जोर नसल्याने सतत रिमझिम पाऊस धारा सुरू आहेत. सुदैवाने यामुळे शहरातील कुठल्याही सखल भागात पाणी साचले नाही. परंतु शहराच्या सीमेवरून वाहणारी कामवारी नदी पात्रात पाणी पातळीत वाढ झालेली आहे. त्यामुळे कामवारी नदी दुधडी भरून वाहण्यास सुरुवात झाली आहे. पावसाचा जोर सायंकाळपर्यंत असाच कायम राहिल्यास नदीलगतच्या शहर व ग्रामीण भागातील शेलार, म्हाडा कॉलनी, ईदगाह या परिसरात पाणी शिरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर भिवंडी पालिकेचे आपत्कालीन कक्ष दक्ष असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे.



## भिवंडीत विद्याश्रम पोस्ट कार्यालयात आयटी २.० सुविधा शुभारंभ



**भिवंडी : वार्ताहर**

देशात सर्वदूर डाक टपाल सेवा देणाऱ्या पोस्ट सेवा अधिक गतिमान होण्यासाठी डाक व टपाल विभागा कडून आय टी २.० ही सॉफ्टवेअर सुविधा सुरू करण्यात आली आहे. भिवंडीतील विद्याश्रम पोस्ट कार्यालयात आय टी २.० हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर अँडव्हान्स पोस्टल टेक्नॉलॉजी या डिजिटल परिवर्तन उपक्रमाचा शुभारंभ स्थानिक माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या शुभहस्ते फित कापून मंगळवारी करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी पोस्टमास्तर दिलीप बांबरे तसेच सर्व पोस्ट कार्यालय कर्मचारी वर्ग व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारत सरकारच्या डाक विभागाच्या या उपक्रमामुळे आता टपाल सेवा अधिक गतिमान, पारदर्शक व नागरिकांसाठी सुलभ होणार आहे.

या माध्यमातून ग्राहकांना देशात कोठेही पोस्टचे व्यवहार करता येणार आहेत. पत्रव्यवहार व पार्सल संदर्भात जाणून घेता येणार आहे. डिजिटल युगाशी सुसंगत अशी ही नवी प्रणाली भविष्यात निश्चितच भारतीय डाकसेवेला चांगले दिवस दाखवून देईल असा विश्वास पोस्टमास्तर दिलीप बांबरे यांनी व्यक्त केला आहे.


महाराष्ट्र पोलीस

**पोलीस निरीक्षक**
**पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, पालघर**
**पोलीस अधीक्षक पालघर कार्यालय जिल्हा - पालघर**
**मोरेकुरण - प्रशासकीय संकुल मोरेकुरण -कोळगांव रोड**
**टेलिफोन क्र.:- ०२५०-२०५३७४**
E-mail - wireless.plgr@mahapolice.gov.in

पुण्यश्लोक ३००

जा.क्र : पोनि/पो.द.व.मा.तं./नादुरुस्त निरुपयोगी साहित्य लिलाव/६६६/२०२५ दि.२५/०७/२०२५

**नादुरुस्त व निरुपयोगी साहित्याचा जाहीर लिलाव करणेबाबत जाहिरात**

पोलीस अधिक्षक पालघर अधिनिस्त सुर्या कॉलनी येथील केदार व मल्हार बिल्डींग बिडको रोड पालघर येथे दिनांक १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. पोलीस अधिक्षक पालघर यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयातील नादुरुस्त व निरुपयोगी साहित्याचा जाहीर लिलाव होणार आहे. लिलाव करण्याच्या साहित्याची यादी व साहित्य केदार व मल्हार बिल्डींग बिडको रोड पालघर येथे कार्यालयीन वेळेत दि. ०५/०८/२०२५ ते ०८/०८/२०२५ या काळावधीत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

सदरचे साहित्य जेथे आहे. तेथेच लिलाव झाल्यावर घ्यावयाचे आहे. ज्या व्यक्ती, संस्था यांना या लिलावात सहभागी व्हायचे आहे. त्यांनी लिलावाच्या दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत पोलीस अधिक्षक कार्यालयात नोंदणी करावयाची आहे. अनामत रक्कम रु.१ हजार इतकी कार्यालयात लिलावाच्या आधी जमा करणे अनिवार्य आहे. अनामत रक्कम जमा न केल्यास लिलावात सहभागी होता येणार नाही. लिलाव बाबतच्या नियम व अटी QR code द्वारे दिल्या आहेत. त्याच्या अधिन राहुनच लिलावात सहभागी व्हायचे आहे, असे आवाहन पोलीस उप अधिक्षक पालघर (गृह.) यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

ठिकाण : पालघर

**सही/-**
**(संगीता शिंदे-अल्फोन्सो)**
**पोलीस उप अधिक्षक (गृह.)**
**पोलीस अधिक्षक कार्यालय पालघर**

**जिमाका/पालघर/जाहि ५३/३३१/२०२५ दिनांक : २५/०७/२०२५**

जुगार आणि बाई या दोन गोष्टींचे व्यसन माणसाला आयुष्यातून उठवते. त्यामुळे लोकांनी या दोन गोष्टींपासून दूर रहायला हवे. पण हे सांगणार कोण? लोकप्रतिनिधी म्हणून लोकांनी निवडून दिलेले आमदार, खासदार हे लोकांचे मार्गदर्शक असतात. पण तेच जर जुगारी आणि दारुडे असले तर ते लोकांना कुठल्या तोंडाने उपदेश करतील? लोकप्रतिनिधी हा चारित्र्यवान असावा लागतो तरच लोकांच्या नजरेत त्याची इज्ञत राहते. लोक त्याचा आदर करतात. पण सध्याच्या लोकप्रतिनिधींचे चारित्र्य हा संशोधनाचा विषय आहे आणि सध्याच्या महायुतीच्या सरकारमधील मंत्र्यांना चारित्र्यवान म्हणण्याचे धाडस कुणीही करणार नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात मोजता येणार नाहीत इतके जुगाराचे क्लब आहेत. त्यांच्या पाचपाखाडी मतदार संघातही क्लब आहेत. त्यामुळे यथा राजा तथा प्रजा या म्हणण्यानुसार जर उपमुख्यमंत्र्यांच्या मतदार संघात जुगाराचे क्लब असतील तर त्यांच्या मंत्रिमंडळातील एखादा मंत्री सभागृहात रमी खेळला तर कुठे बिघडले? पण आजकाल टीआरपी वाढवण्याच्या शर्यतीत अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मिडियावाल्यांना हे कोण सांगणार? मंत्र्यांकडून दिवाळीही घ्यायची आणि त्यांची बदनामी सुधा करायची हे योग्य आहे का? कोकाटे सारखा सज्ञन माणूस उभ्या महाराष्ट्रात शोधून सापडणार नाही. त्यांनी वर्षभरात रमी खेळूनकाहोईना शेतकऱ्यांना निश्चितपणे कर्जमुक्त केले असते. याची दादांना सुधा खात्री होती. म्हणून तर त्यांच्याकडे कृषी खाते देण्यात आले. पण मिडियावल्यानी सगळी वाट लावली बाहेरच्या लोकांना सोबत घेऊन सत्ता स्थापन करणाऱ्या फडणवीसांनी भाजपच्या तर अब्रूचे धिंडवडे काढलेच आहेत.पण महाराष्ट्राच्या राजकारणाचा सुधा सत्यानाश केला आहे. पावसाळी अधिवेशन काळात विधानभवनाच्या आवरत राडेबाजी घटना ताजी असतानाच,

# एक डाव रम्मीचा!

आता कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा चक्क विधी मंडळात मोबाईलवर रमी खेळत असल्याचा व्हिडिओ प्रसिद्ध झालाय. संतापाची बाब म्हणजे या घटनेचा निषेध करण्याऐवजी, राज्य मंत्रिमंडळातील एक मंत्री सरनाईक यांनी अमीरखान, सलमान खान हे सुद्धा रमी खेळतात. तर कोकाटे खेळले तर काय बिघडले. असे म्हणत कोकाटेंचे समर्थन केले आहे. आता यथा राजा तथा प्रजा! एका मंत्र्याने जर कोकाटेंचे समर्थन केले असेल. तर मुख्यमंत्र्यांनी तरी का मागे रहावे?मोबाईलवर रमी खेळणे हा गुन्हा नाही. मात्र अशा पद्धतीचे गेम चालवणे हा गुन्हा आहे. आपण याबाबत केंद्राशी बोलणार आहोत. असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी सुधा कोकटेंची अप्रत्यक्षरित्या पाठराखण केली आहे. महाराष्ट्राचे राजकारण कधीच इतके रसातळाला गेले नव्हते. पण सरकार टिकवण्यासाठी सर्व प्रकारच्या गुन्हेगारीला पाठीशी घालणाऱ्या फडणवीसनी महाराष्ट्राला युपी बिहारच्याही पुढे नेवून ठेवले आहे. विधानभवन हे लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे. आणि त्याचे पावित्र्य टिकवण्याची सर्वात मोठी जबाबदारी मुख्यमंत्री आणि सरकारची आहे. पण विधानसभेत मोबाईलवर रमी खेळणे हा गुन्हा नाही. असे जर मुखमंत्र्यांना वाटत असेल, आणि विधानभवन व तिथला परिसर हेच गुन्हेगारी आणि गुन्हेगारांसाठी योग्य ठिकाण आहे, अशी सरकारची भूमिका असेल तर विधानभवनात रमीच काय कॅसिनो खोला. आणि सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी विकून त्या पैशातून जुगार खेळायला लावा. आणि तेही कमी पडत असेल तर विधानभवन परिसरात कुंटणखाने खोला, म्हणजे अधिवेशनाच्या काळात तिथे येणाऱ्या आमदार आणि त्यांच्या समर्थकांना दुसरीकडे जाण्याची आवश्यकता भासणार नाही.

अरे नागपूरच्या अनजीपंता कुठे नेवून ठेवलास आमचा महाराष्ट्र? जोपर्यंत राज्यात महायुतीचे सरकार आहे. तोवर सज्ञन माणसांना महाराष्ट्रात राहण्याची सोय राहिलेली नाही. भाजपातल्या सज्ञन आणि महाराष्ट्रावर प्रेम करणाऱ्या लोकांना महाराष्ट्राची होत असलेली ही दुर्दशा दिसत नाही का? आणि दिसत असेल तर ते गप्प का? बाहेरून आलेल्या लोकांमुळे भाजपची जनमानसात जी छी.. थुं.. होत आहे ती तशीच होत रहावी, अशी सज्ञन भाजपा नेत्यांची इच्छा आहे का ? याचे उत्तर त्यांनी द्यावे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने वादात सापडले आहेत. वाद आणि कोकाटे हे समीकरण आता जास्तच जुळल्याचे एका व्हिडिओवरून समोर आले आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानसभा सभागृहात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल होताच विरोधक त्यांच्यावर तुटून पडले. आमदार रोहित पवार यांनी त्यांच्या एक्स हँडलवरून हा व्हिडिओ शेअर करताच आरोपांचा डाव रंगला आहे. तर कृषीमंत्र्यांवर चौफेर हल्ला सुरू झाला आहे. एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी एक करण्याची वेळ आली तर आम्ही भाजप श्रेष्ठीना विचारू असं सुनील तटकरे यांनी म्हणल्यानंतर, आमदार रोहित पवार यांनी तटकरे यांना उत्तर देताना सत्तेतल्या राष्ट्रवादी गटाला, भाजपला विचारल्याशिवाय काहीच करता येत नाही. म्हणूनच शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित असताना, राज्यात रोज ८ शेतकरी आत्महत्या करत असताना, भाजप निर्णय घेत असल्यामुळे राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना काही काम शिल्लक राहिलेलं नाही. आणि त्यामुळेच कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना सभागृहात बसून रम्मी खेळण्याची वेळ आली असावी असा टोला लगावला आहे. रोहित पवार यांनी कृषिमंत्री कोकाटे यांचा व्हिडिओ ट्विट करताना जंगली रम्मी पे आओ ना महाराज म्हणत कृषीमंत्र्यांच्या परिस्थितीची खिल्ली उडवली आहे. हा झाला राजकारणाचा भाग! पण विधानभवनात जर कृषीमंत्रीच रम्मी खेळायला लागले तर शेतकऱ्यांनी त्यांच्याकडून काय अपेक्षा ठेवावी. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची खूप वाईट अवस्था आहे. गेल्या दोन दशकात तब्बल ४० हजार कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. आज त्यांची कुटुंब कशी जगत आहेत याचा सरकारने कधी तरी विचार करावा. पण शेतकऱ्यांचा विचार करायचे बाजूलाच राहिले उलट सरकारमधील मंत्रीच शेतकऱ्यांना म्हणतात. शेतकऱ्यांच्या अंगावरचे कपडे मोबाईल आम्ही दिलेला आहे. जो शेतकरी दिवसरात्र शेतात घाम गाळून आपल्या कष्टाचे खातो, आपल्या कष्टाच्या पैशातून अंगावर कपडे घालतो. मोबाईल घेतो त्या शेतकऱ्याचा मंत्र्यांनी अभिमान बाळगायला हवा. त्याचबरोबर त्याच्या अंगावरचे कपडे आणि मोबाईल रमी सारख्या जुगाराच्या पैशातून आलेले नाहीत याचे कृषिमंत्र्यांनी भान ठेवावे. उलट त्यांनी आपण रमी खेळत असल्याच्या आरोपाचा इनकर केला आहे. म्हणे आपण ऍड स्वीप करीत होतो. आता ऍड स्वीप करायला इतका वेळ लागतो का? हा झाला एक भाग आपल्यावरील आरोप फेटाळताना त्यांनी आपल्याच सरकारला भिकारी म्हटले आहे. पिक विम्याच्या एक रुपयाबद्दल बोलताना काही दिवसांपूर्वी ते म्हणाले होते, की आजकाल भिकारी सुधा एक रुपया घेतवंही. त्यानंतर आता ते म्हणत आहेत की शेतकऱ्याला नव्हे तर सरकारला भिकारी म्हटले होते. आता बोला! सरकार भिकारी आहे याची जर मंत्रीच कबुली द्यायला लागलेव तर इतरांचे काय? या सर्व पार्श्वभूमीवर कोकाटेना अजूनही मंत्रिमंडळात ठेवले जाणार, की त्यांना रमी खेळायला कायमचे घरी पाठवणार ?याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील मूळ शब्द व त्यांचा विपर्यास...!

कोणत्याही देशाची शासन व्यवस्था ही त्या देशातील संविधानावर अवलंबून असते. संविधानामध्ये ढोबळ मानाने देशातील सत्तेचे स्वरूप नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्य केंद्र राज्य संबंध इत्यादी तरतुदी असतात. भारतीय संविधान निर्मितीचा मागवा घेताना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीत घटना मंजूर होऊन २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय जनतेच्या सर्वांगीण स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली. आपले संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित असणारे संविधान आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीची धारणा करणारे संविधान असून आता अमृत महोत्सवी वर्षात अव्याहतपणाने वाटचाल करीत आहे. कोणत्याही घटनेचे प्रतिबिंब प्रास्ताविकात स्पष्ट असते. सविधानाची प्रस्ताविका/ उद्देशिका ही संविधानाचा प्राण असतो. आपल्या घटनेच्या सुरुवातीला उद्देशिका दिलेली आहे, पण सध्याच्या काळात उद्देशिकेतील काही शब्दांमध्ये जाणीवपूर्वक चुका करून जनतेची दिशाभूल केली जाते. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे यांच्या वतीने पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जाते इयत्ता पहिलीपासून ते बारावीपर्यंतच्या पुस्तकांमधून भारतीय संविधानाची उद्देशिका आणि प्रतिज्ञा पाठ्यपुस्तकांमध्ये सुरुवातीलाच छापण्यात येते इयत्ता दहावीच्या हिंदी भाषेच्या लोकभारती पुस्तकांमध्ये ही उद्देशिका छापलेली आहे. मंडळाच्या वतीने हे पुस्तक पाचव्यांदा प्रकाशित करण्यात आल्याचे बातमीवरून समजते छापण्यात आलेल्या उद्देशिकेमध्ये जाणीवपूर्वक काही शब्दांची मोडतोड करण्यात आलेली आहे. अशी मोडतोड करण्याचा अधिकार संबंधितांना कोणी दिला आहे. उद्देशिकेमध्ये धर्मनिरपेक्ष असा शब्द असताना त्या ऐवजी पंत निरपेक्षक असा शब्द छापण्यात आला आहे. समता शब्द ऐवजी समरसता हा शब्द आहे. तर श्रद्धेच्या ऐवजी धर्म शब्दाचा वापर केला आहे मूळ उद्देशिकेच्या शेवटी २६ नोव्हेंबर १९४९ अशी तारीख आहे. उद्देशिकेमध्ये अशी तारीख दिलेली असताना त्यापुढे मिती मार्गशीर्ष शुक्ल सप्तमी सावंत २००६ विक्रमी अशेच छापलेले आहे. खरे तर याची गरज नसताना हे जोडलेले आहे आपली राज्यघटना स्वतः प्रत अर्पण केलेले असताना आत्म समर्पित छापले आहे अशा चुका करणारे जे कोणी महाभाग आहेत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. पुढे याच पुस्तकात मूलभूत कर्तव्य छापण्यात आली आहेत त्यात सुद्धा अनेक चुका असल्याचे निदर्शनात आले आहे. खरे तर पाठ्यपुस्तकाची निर्मिती करण्यासाठी जे अभ्यास मंडळ नेमण्यात येते त्यांनी फक्त अभ्यासक्रम तयार करायचा असतो इतर कामाशी त्यांचा संबंध येत नाही पण ज्या मंडळाकडून हे पुस्तक छापण्यात येतात त्यांना दोषी ठरवून कायदेशीर कारवाई होणे आवशयक आहे भारतीय संविधान निर्मितीचा मागोवा घेत असताना आपल्याला माहित आहे की घटनेच्या सुरुवातीलाच उद्देशिका दिलेली आहे.

भारतीय उद्दिष्टांचा ठराव तेरा डिसेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेत मांडला होता त्याला पुरुषोत्तम दास टंडन यांनी अनुमोदन दिले होते संविधान सभेचे अध्यक्ष असलेले डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांच्या परवानगीने १६ डिसेंबर १९४६ पासून त्यावर चर्चेला सुरुवात झाली काही दुरुस्तीचे प्रस्तावआले होते. उद्दिष्टांचा ठराव २२ जानेवारी १९४७ रोजी सर्व संमत झाला त्यानंतर ३० मे १९४७ ला संविधान सल्लागार बी.एन. राव यांनी राष्ट्रीय संविधानाचा एक मसुदा तयार केला त्यामध्ये सरनामा अत्यंत त्रोटक स्वरूपात दिलेला होता त्यामध्ये तात्विक मुद्यांना स्थान नव्हते त्यानंतर २९ ऑगस्ट १९४७ ला अस्तित्वात आलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीने संविधानाचा मसुदा तयार केला. (संदर्भ अस्मिता दर्श भारतीय संविधान विशेष अंक




१९१७ भारतीय संविधानांचा सरनामा डॉक्टर रा.का.क्षीरसागर)

प्रस्ताविकेत स्पष्ट म्हटलेले आहे की आम्ही भारताचे लोक संविधान सभेच्या सभेत त्यावेळी काही सभासदांनी संविधानाची सुरुवात ही अल्ला या शब्दाने करावी असे हजरत मोहली म्हणाले तर ओम नमः शिवाय या शब्दांनुसार सुरुवात व्हावी अशी सूचना मदन मोहन मालवीय यांची होती आणि एचपी कामत यांनी ईश्वर शब्दाला प्राधान्य देण्यात यावे असे म्हटले होते. मात्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून ज्या लोकांचे हित साधायचे आहे ज्यांचे कल्याण करायचे आहे. ज्या लोकांनी लोकांकडून लोकांसाठी हा शब्द लोकशाहीचा डोलारा उभा करायचा आहे त्यांच्या नावाने म्हणजे लोकांच्या नावाने सुरुवात करावी अशी सुचविले चर्चेअंती शेवटी या विषयाला अनुसरून सदरचा विषय मतदानास टाकण्यात आला. ४९% मताधिक्याने लोकांचा विजय झाला आणि २५ नोव्हेंबर १९४९ रोजी बाबासाहेबांनी घटना समिती समोर जे भाषण केले ते महत्त्वपूर्ण आहे आपल्या भाषणात ते म्हणाले होते संविधानाची अंमलबजावणी करणाऱ्या प्रामाणिक तथा अ प्रामाणिकहाताचा उल्लेख करताना सामाजिक समता निर्माण झाली नाही तर संविधान लोकांना कुछ कामी वाटेल लोकशाहीमध्ये व्यक्तिवाद जोपासू नये कोणी किती मोठा असला तरी त्याच्या चरणी आपले स्वातंत्र्य अर्पण करू नये असे झाल्याने ते सार्वजनिक संस्था उध्वस्त करू शकतात म्हणून प्रयत्नाने मिळवलेले स्वातंत्र्य एकदा गमावले की ते पुन्हा मिळवता येणार नाही इत्यादी सह अनेक धोके त्यांनी बोलून दाखवले होते आजच्या घडीला त्याची प्रचिती येताना दिसते काय असा प्रश्न निर्माण झाला आहे काही दिवसापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसबाळेयांनी समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द प्रस्ताविकेत राहावेत की नाही यावर चर्चा झाली पाहिजे असे म्हटले होते त्यातून समाजवादी धर्मनिरपेक्ष याविषयी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका याही पूर्वी स्पष्ट करण्यात आली आहे आणीबाणीचा दिवस जेव्हा येतो तेव्हा नेमके या संदर्भात विवेचन करण्यात येते त्यावर कडी म्हणजे आपले उपराष्ट्रपती यांनी देखील एका भाषणात आणीबाणीच्या काळात उद्देशिकेत समाजवादी धर्मनिरपेक्ष आणि अखंडता हे शब्द घातले आहेत असे म्हटले आहे. वास्तविक हे लोक घटनात्मक पदावर असतात अशा लोकांनी एखाद्या पक्षाची री ओढणे योग्य नाही किंबहुना तो त्यांचा अधिकारच नाही. २०१४ नंतर भारतीय संविधान पूर्व प्रकाशित करण्यात आलेले नाही जनतेच्या डोळ्यात धुळपेकण्यासाठी २०१४ सालाचे ठिकाणी २०२४ लिहून फक्त कव्हर बदलून तेच प्रत प्रकाशित करण्यात आली कारण त्यात दुरुस्त्या २०१४ पर्यंतच्याच आहेत यावरून ही बनवाबनवी लक्षात येते पुढील काळात असेच बदल होतील तर ते होऊ नये यासाठी नागरिक म्हणून आपण दक्ष राहणे आवश्यक आहे.

**– प्राचार्य शंकर सोनवणे**

# वाघनाळवाडी मूलभूत सुविधापासून वंचित

## रस्ते, वीज व बससेवेसाठी ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**लातूर : वार्ताहर**

देवणी तालुक्यातील वाघनाळवाडी हे गाव तब्बल ३० वर्षांपासून रस्ते, नाल्या, वीज आणि बससेवेसह सर्वांगिन विकासापासून वंचित आहे. तालुक्याचे आमदार किंवा कोणत्याही लोकप्रतिनिधीने या गावाकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्यामुळे वाघनाळवाडी गावाला मुलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी आज २४ जुलै रोजी लातूरच्या जिल्हाधिकार्यांना वंचित बहुजन आघाडी लातूर शहर महासचिवआकाश इंगळे यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांच्या एका शिष्टमंडळाने निवेदन देवून वाघनाळवाडी ते लातूरपर्यंत पायी चालत येऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. वाघनाळवाडी या गावची दळणवळणाची व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली आहे. गावात कोणाला साप चावला, कोणी आजारी असेल तर ती व्यक्ती दवाखान्यापर्यंत पोहोचत नाही, गावातली गरोदर बाळंतीण बाई, माता, भगिनींना दवाखान्यात घेऊन जाताना रस्त्यावरच्या आदळ आपट्याने रस्त्यावरच बाळंतीण झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. अनेकांना वाटेतच आपला प्राण गमवावा लागला आहे. एक तर या गावाला रस्ता करा अन्यथा या गावचे कुठेतरी चांगल्या रस्त्याच्या कडेला या गावचे पुनर्वसन करा ही मागणी वंचित बहुजन आघाडी लातूर शहर व गावातील नागरिकांची आहे. वाघनाळवाडी निलंगा विधानसभा मतदारसंघातील हे एक गाव. या गावची लोकसंख्या चारशे ते साडेचारशे. जवळगा या ग्रुप ग्रामपंचायतशी जोडलेले हे गाव रस्त्यासाठी या गावचा वनवास अजूनही सुरूच आहे. गावाला पक्का रस्ता मिळावा ही मागणी गावकर्यांची गेल्या अनेक वर्षापासूनची आहे. या गावानं अनेकांना खासदार केलं, मुख्यमंत्री, आमदार केलं, मंत्री केलं मत मागायला पुढारी गावात आले की तुमचा रस्त्याचा प्रश्न सोडवू म्हणून मते घेतली. रस्ता काही झालाच नाही.

आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांना या गावाने एकतर्फी प्रचंड मताधिक्याने एकदा नव्हे, अनेकदा निवडून दिले. संभाजीराव पाटील आमदार झाले, मंत्रीही झाले , पण रस्ता काही झाला नाही, गावचा कसलाच विकास झाला नाही. यापुढे जोपर्यंत गावाला रस्ता होणार नाही तोपर्यंत सर्वच पुढार्यांना गावबंदीचा निर्णय संपूर्ण गावकर्यांनी एक मुखाने घेतला आहे. तात्काळ सर्व बाबीचा विचार करता या गावातील नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात अन्यथा होणार्या आंदोलनास प्रशासन जबाबदार राहील, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देणार्या शिष्टमंडळात वचिंत बहुजन आघाडीचे लातूर शहर महासचिव आकाश इंगळे, जिल्हा महासचिव ॲड.रोहित सोमवंशी, महिला शहर अध्यक्ष सुजाता अजनीकर, लातूर तालुका अध्यक्ष सुनील कांबळे, यशपाल सरवदे, कबीर कांबळे, मनोज वाघमारे व वाघनाळवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात लंपी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीकरण, जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपायांवर भर

**लातूर : वार्ताहर**



जिल्ह्यात गोवर्गीय पशुधनात लंपी त्वचारोगाचा प्रादुर्भाव आढळून आला असून आतापर्यंत चार तालुक्यातील १२ गावांमध्ये एकूण ४७ बाधित गोवर्गीय जनावरांची नोंद झाली आहे. जिल्हा प्रशासन व पशुसंवर्धन विभागाने तातडीने सज्जता दाखवत शीघ्र कृती दल स्थापन केले आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व १३२ पशु चिकित्सालये व तीन फिरते पशु चिकित्सालय आदी पशुवैद्यकीय संस्थांना शासनाच्या मानक कार्यपद्धतीनुसार विलगीकरण, औषधोपचार, बाह्यपरोपजीवी नियंत्रण आणि डिसइन्फेक्शनबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. बाधित गावे आणि बाधित जनावरांची स्थिती अहमदपूर तालुका: वरवंटी, धसवाडी, कोंडगाव, ब्रम्हपुरी, शिंदगी - या ५ गावांत प्रादुर्भाव. २६ जनावरांपैकी ५ बरे, १९ वर उपचार सुरू, २ मृत्यू. लातूर तालुका: बोरवटी,खुलगापूर, सलगरा ही तीन गावे ३ रुग्णांपैकी २ बरे, १ वर उपचार सुरू. उदगीर तालुका: हेर, डोंगरशेळकी, देवर्जन - या ३ गावांत प्रादुर्भाव. ७ बाधित जनावरांपैकी ३ बरे, ४ वर उपचार सुरू. देवणी तालुका: अंबानगर गोशाळा - येथे ११ बाधित जनावरे, उपचार सुरू असून काही बरे झाले आहेत. एकूण : चार तालुक्यातील १२ गावांतील ४७ बाधित बाधित जनावरांपैकी १० जनावरे पूर्ण बरी झाली असून २ जनावरांचा मृत्यू, उर्वरितांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान लसीकरणासाठी जिल्ह्यातील गोवर्गीय पशुधनासाठी १,७६,५०० लसी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १,५९,५०० लसीकरणासाठी वापर करण्यात आल्या आहेत. सध्या १७,००० लसी शिल्लक असून त्या तातडीने पशुपालकांच्या जनावरांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जिल्हा व तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करून दैनंदिन आजाराची माहिती गोळा केली जात आहे. बाधित व शेजारील गावांत गोचीड, माश्या आणि इतर बाह्य परोपजीवींचे नियंत्रण करण्यासाठी औषधांची फवारणी व विशेष उपाययोजना केली जात आहे. गावात तात्काळ पोहोचून तपासणी, उपचार, नमुने गोळा करणे व विलगीकरणाच्या सूचना देण्यासाठी शीघ्र कृती दल सज्ज ठेवण्यात आले आहे. पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना सूचना सर्व संस्था प्रमुखांनी आपल्या कार्यक्षेत्रातील लसीकरण मोहिमा, जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर भर द्यावा. बाधित रुग्ण आढळून आल्यास त्वरित शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार उपचार करण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी दिल्या आहेत. पशुपालकांनी सतर्क राहून आपला गोठा स्वच्छ ठेवावा. बाह्य परोपजीवी नियंत्रणासाठी आवशयक औषधांची फवारणी करावी. जर पशुरुग्ण आढळून आला तर तात्काळ जवळच्या पशुवैद्यकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे. दरम्यान आपल्या गोवर्गीय पशुधनाला लंपी रोगप्रतिबंधक लस तात्काळ द्यावी. आजाराची लक्षणे (त्वचेवर गाठी, ताप, भूक मंदावणे) आढळल्यास त्वरित जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. गोठ्यांमध्ये स्वच्छता ठेवून गोचीड व माश्यांचे नियंत्रण करावे. नियंत्रण कक्ष व पशुसंवर्धन अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवून दैनंदिन आजाराची माहिती द्यावी.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

28 JULY TO 03 AUGUST 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 7/26/2025 9:19 PM Page 1



# देवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षावरील अविश्वास ठरावाची सभा व्यपगत; दिवसभर वातावरण तणावपूर्ण



**देवणी : शकील मनियार**

नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदावरून गेल्या तीन महिन्यापासून दुसऱ्या नगरसेवकास नगराध्यक्ष करण्याच्या कारणावरून धुसफूस व नाराजी नाट्य सुरू असल्याने १२ नगरसेवकांनी देवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षावर अविश्वास ठराव जिल्हा प्रशासनाकडे दाखल केला होता. त्याअनुषंगाने शुक्रवारी याबाबत नगरपंचायतीत या ठरावासाठी बोलावलेली सभा व्यपगत झाल्याची माहिती पिठासन अधिकारी शरद झाडके यांनी दिली. अविश्वास दाखल करणारे त्या बारा नगरसेवकांना रितसर नोटीस देऊन व चार वेळेस पुकारले असतानाही ते नगरसेवक वेळेत सभागृहात न आल्याने गणपुर्ती अभावी बैठक झाली नाही. सदर बैठकीस काग्रेसचे किर्तीताई घोरपडे (नगराध्यक्षा), उपनगराध्यक्ष अमित मानकरी, सभापती रेणुका कोतवाल, शारदा लांडगे व नगरसेविका भाग्यलक्ष्मी मळभागे व स्विकृत सदस्य महादेव मळभागे व योगेश ढगे हे उपस्थित होते.

**अविश्वास दाखल करणारे बारा नगरसेवक**

अविश्वास दाखल केलेल्या काँग्रेस नगरसेवकांमध्ये प्रवीण बेळळे, मेहरुनिसा शेख, जमीर तांबोळी, नदीम मिर्झा, सत्यभामा घोलपे, वंदना बंडगर, बानूबेगम मोमीन, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रा. अनिल इंगोले, विमलताई बोरे, भाजपाचे किशोर निडवंचे, अपक्ष निवडून आलेले पण भाजपामध्ये असलेले नागेश जीवने आणि अपक्ष अमित सूर्यवंशी असे एकूण १२ नगरसेवकांनी अविश्वास ठराव दाखल केला होता. पिठासन अधिकारी म्हणून शरद झाडके तर सहाय्यक म्हणून तहसिलदार सोमनाथ वाडकर, मुख्यकार्यकारी अधिकारी संतोष लोमटे यांनी काम पाहिले. तब्बल पाच तास चाललेल्या या विशेष सभेच्या परिसरात प्रचंड तणाव होता.याबेळी उपविभागीय पोलिस अधिकारी नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अभिषेक शिंदे यांनी पोलिसाची वाढिव कुमक मागवून चोख बंदोबस्त ठेवला होता. नगराध्यक्षांच्या विरोधातील अविश्वास ठराव पारित न झाल्याने काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत गुलाल उधळून व मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

**गाव करील ते राव काय करील - साळुंके**

राज्यात महायुतीचे सत्तेच्या जीवावर फोडाफोडीचे जे राजकारण सुरू केले त्याला जोरदार चपराक आज काँग्रेस आणि देवणीच्या जनतेने दिलेली आहे, गाव करेल ते राव काय करेल या म्हणीप्रमाणे लोकांनी महायुतीच्या फोडाफोडीच्या राजकारणाला अद्दल घडवलेली आहे.

ज्या काँग्रेस नगरसेवकांना दिशाभूल करून भाजप फसवले त्यांना सुद्धा येणाऱ्या काळात सोबत घेऊन काँग्रेस पक्षाचा विचार आणि रुजवत राहणार माजी मंत्री अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यात काँग्रेस मजबुतीने उभी राहील हेच आज देवणीच्या जनतेने दाखवून दिलेला आहे. मी मल्लिकार्जुन मानकरी व सर्व काँग्रेस नेते कार्यकर्ते नगरसेवक व व देवणीतील जनतेचे अभिनंदन करतो अशा प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अभय साळुंके यांनी दिल्या.

## तलासरी येथे ४६ हजारांचा गांजा जप्त, दोघांना अटक

**डहाणू : वार्ताहर**



तलासरी पोलिस ठाणे हद्दीत २० जुलै रोजी तलासरी इभाडपाडा येथील तास्कंद हॉटेलजवळ गांजाची खरेदी-विक्री करण्याच्या उद्देशाने आलेल्या दोन व्यक्तींना तलासरी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून ४६,६६० रुपये किमतीचा २.३३० किलोग्रॅम गांजा, २९,५०० रुपयांची रोकड, दोन मोबाईल फोन आणि दोन दुचाकी असा एकूण ३,९४,१६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रविवारी पोलिस कर्मचारी गस्त घालत असताना, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत इभाडपाडा येथील तास्कंद हॉटेलजवळ दोन व्यक्ती गांजाची खरेदी-विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे, वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन पोलिसांनी दोन पंच, वजनकाटा करणारा व्यक्ती आणि फोटोग्राफर यांना सोबत घेऊन दोन पोलीस पथके तयार केली. तास्कंद हॉटेलजवळ सापळा रचून बसले असता, दोन संशयित व्यक्ती दुचाकीवर हॉटेल परिसरात आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांची आणि त्यांच्या गाडीची झडती घेतली असता त्यांच्याकडून २.३३० किलोग्रॅम वजनाचा गांजा सदृश्य पदार्थ आढळून आला. याप्रकरणी संतोष दुर्योधन स्वाईन वय ३८, रा. तलासरी, सुतारपाडा आणि बापटीस्ट नवसु धोडी वय २४, रा. खेरडी खाडीपाडा, दादरा नगर हवेली (केंद्र शासित प्रदेश) या दोघांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये ४६,६६० रुपयांचा गांजा सदृश्य वनस्पती, २९,५०० रुपयांची रोकड, दोन मोबाईल फोन आणि दोन दुचाकी मोटारसायकल असा एकूण ३,९४,१६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याबाबत कायदेशीर कारवाई पूर्ण करण्यात आली असून, पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तलासरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अजय गोरड आणि उपनिरीक्षक अमोल चिंधे करत आहेत.

## भिवंडीत टेम्पो चालक वाहतूक पोलिसांमध्ये हाणामारी

**भिवंडी : वार्ताहर**



भिवंडी तालुक्यातील सदैव वाहतूक कोंडी मध्ये गुदमरणाऱ्या भिवंडी ठाणे मार्गावर पूर्णा गावा जवळ वाहतूक पोलीस व वाहन चालकामध्ये हाणामारीचा झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. भिवंडी ठाणे रस्त्यावरील पूर्णा गावच्या हद्दीत ही घटना घडली आहे. दुपारी तीन वाजताच्या सुमारास टेम्पो चालक येत असताना वाहतूक पोलिस विजय चव्हाण यांनी टेम्पो चालकास वाहन थांबवण्याचा इशारा दिला. परंतु टेम्पो चालकाने टेम्पो न थांबवल्याने वाहतूक पोलिस व वॉर्डन यांनी टेम्पो चालकास थांबवून जाब विचारला असता. टेम्पो चालकाने शिवीगाळ करण्यास सुरवात केली. त्यामुळे संतप्त टेम्पो चालकास खाली उतरवण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिस करत असताना टेम्पो चालकाने वाहतूक पोलिस विजय चव्हाण यांना ठोसे मारण्यास सुरवात केली. या घटनेचा संपूर्ण प्रकार मोबाईलमध्ये चित्रित झाल्याने मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणी विजय चव्हाण यांनी नारपोली पोलिस ठाण्यात टेम्पो चालका विरोधात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

## पालघर पोलिसांकडून १११ किलो अफू जप्त



**पालघर : वार्ताहर**

पालघर पोलिसांनी मोखाडा येथे केलेल्या कारवाईत १११ किलोपेक्षा जास्त अफू आणि एक कार असा एकूण १५ लाख ८० हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २१ जुलै रोजी पहाटे २.०२ वाजता मोखाडा पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार शशिकांत भोये आणि पोलिस अंमलदार बापू नागरे रात्रीची गस्त घालत असताना, मोखाडा-त्र्यंबक रोडवर एक कार भरधाव वेगाने जात असताना त्यांना संशय आला. पोलिसांनी तात्काळ कारचा पाठलाग केला असता मौजे चिचुतार गावाजवळ कार चालकाने अंधाराचा फायदा घेऊन गाडीची चावी काढून पळ काढला. पोलिसांनी तात्काळ गाडीची तपासणी केली असता, त्यात ७ लाख ८० हजार ३४० रुपये किमतीचा, १११.४२० किलोग्रॅम वजनाचा अफू वनस्पतीचे सुकलेल्या बोडांचा चुरा आढळून आला. तसेच गाडीच्या दोन बनावट नंबर प्लेट्स आणि ८ लाख रुपये किमतीची गाडी असा एकूण १५ लाख ८० हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी मोखाडा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमनाथ ढोले, मोखाडा पोलीस ठाणे करत आहेत. अंमली पदार्थाशी संबंधित कोणतीही माहिती असल्यास ती तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी शाळा कुंभवली येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**बोईसर : वार्ताहर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस कुंभवली गावात सामाजिक जाणिवेतून साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी शाळा कुंभवली येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. २२ जुलै रोजी झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या हस्ते वाढदिवसाचा केक कापण्यात आला आणि चॉकलेट वाटप करून आनंदाचा क्षण साजरा करण्यात आला.

चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे भाव आणि परिसरात पसरलेले उत्साही वातावरण या उपक्रमाचे खरे यश ठरले. या उपक्रमाचे आयोजन भाजप जिल्हाध्यक्ष भरतभाई राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विशेषतः कुंभवली ग्रामपंचायतीचे सदस्य आणि भाजप कार्यकर्ते अॅड. सुमित रमाकांत पिंपळे यांनी या उपक्रमात पुढाकार घेतला. कार्यक्रमात पालघर पश्चिम मंडळ अध्यक्ष प्रणय म्हात्रे, हर्षल पिंपळे, नांदगावचे माजी उपसरपंच सुमित ठाकूर, चिराग संखे आणि कल्पेश पिंपळे यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. याशिवाय भाजप कार्यकर्ते, शिक्षकवर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळावे आणि त्यांच्या शिक्षणाविषयीची गोडी निर्माण व्हावी, या हेतूने राबवण्यात आलेला हा उपक्रम समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरला असून गावकऱ्यांनी याचे मन:पूर्वक कौतुक केले.

## डहाणू तालुक्यातील कोसेसरी -भवाडी पुलाचे काम अपूर्ण, विद्यार्थ्यांची होडीवरील निर्भरता कायम

**डहाणू : वार्ताहर**



डहाणू तालुक्यातील कोसेसरी आणि भवाडी गावांसाठी अत्यंत आवश्यक असलेले सूर्या नदीवरील पुलाचे काम अर्धवट स्थितीत असल्याने स्थानिक ग्रामस्थांचा प्रवास अजूनही धोकादायकच ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मागणी करूनही या भागातील नागरिकांना अजूनही दररोज होडीच्या साहाय्याने प्रवास करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात नदीला पूर आल्यावर ही सेवा ठप्प होते. परिणामी विद्यार्थ्यांचे शिक्षण, रुग्णांची हालअपेष्टा, तसेच जीवनधोक्याचा प्रश्न निर्माण होतो. गेल्या वर्षी पुलाच्या बांधकामास अखेर मंजुरी मिळाल्यानंतर कामास सुरुवात झाली. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माहितीनुसार, सध्या फक्त ४० टक्के कामच पूर्ण झाले असून उर्वरित काम मे २०२६ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या भागातील सुमारे ७० ते ८० विद्यार्थी दररोज तलवाडा, कासा, डहाणू या परिसरातील शाळा व कॉलेजमध्ये शिक्षणासाठी जातात. त्यांना दररोज होडीने नदी पार करावी लागते. वृद्ध, आजारी नागरिक, महिला आणि कामानिमित्त प्रवास करणारे लोक देखील याच मार्गाचा वापर करतात. पावसाळ्यात नदीला पूर आल्यास होडी सेवा पूर्णतः बंद होऊन अनेक वेळा अपघाताची भीतीही निर्माण होते.या पुलासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य शैलेश करमोडा, स्थानिक ग्रामपंचायती आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रयत्न मोलाचे ठरले असले, तरी सध्या कामाच्या धीम्या गतीमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. पुलाचे काम खूप उशिरा सुरू झाले. त्यामुळे आज अर्धवट काम राहिले आहे. आशा होती की या पावसाळ्यात तरी आमचा वर्षोनुवर्षे चाललेला जीवघेणा प्रवास थांबेल. पण कामाची धीमी गती आणि पावसामुळे आम्हा प्रवास पुन्हा होडीवरच अवलंबून आहे. कधी थांबेल हे देव जाणे, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

## नायगाव लोढा धामजवळ भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वसई : वार्ताहर**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील नायगावच्या मालजी पाडा परिसरातील लोढा धामजवळ गुरुवारी दुपारी झालेल्या भीषण रस्ता अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. मृत तरुण त्याच्या मित्रांसह वसईतील प्रसिद्ध तुंगारेश्वर महादेव मंदिराचे दर्शन घेण्यासाठी दुचाकीवरून गेला होता. प्रत्यक्षदर्शींच्या मते, महामार्गावर वेग जास्त असल्याने दुचाकी घसरली आणि दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. स्थानिक लोकांनी तात्काळ पोलिसांना आणि रुग्णवाहिकेला माहिती दिली, परंतु नायगाव पोलीस उशिरा घटनास्थळी पोहोचले, त्यामुळे लोकांमध्ये संताप दिसून आला. मृताचे नाव राहुल गुप्ता, वय २४ आणि मुंबईतील सांताक्रूझ येथील रहिवासी असल्याचे सांगण्यात आले.अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक सुमारे २ तास पूर्णपणे ठप्प झाली होती. मंदिरात जाणाऱ्या भाविकांना आणि कार्यालयात जाणाऱ्या लोकांना खूप त्रास सहन करावा लागला. या भागात वाहतूक नियंत्रित करण्यासाठी नियमित वाहतूक पोलिस तैनात करावेत आणि वेग नियंत्रणासाठी कडक उपाययोजना कराव्यात अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत असून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### काँग्रेसचे राष्ट्रपतीना निवेदन

वसई : भाजपा सरकार काळात महिलांवर, मुलींवर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार सुरु असले बाबत वसई काँग्रेसने राष्ट्रपतीना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे. सदर निवेदन वसई तहसिलदार यांना सादर करण्यात आले. निवेदनात शाळेतल्या चिमुकल्या मुली सुरक्षित नाहीत. ही बाब देशासाठी व मानवतेसाठी गंभीर असल्याचे म्हटले आहे. ज्या देशात राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री महिला होऊन गेल्या तसेच आज आर्मीत, पोलिस खात्यात व इतर सरकार हुद्यावर महिला आपल्या कर्तव्याने ठसा उमटवत असताना भाजपाच्या राज्यात महिला, मुली असुरक्षित झाल्या आहेत, याचा आम्ही त्रिवर निषेध करत असल्याचे म्हटले आहे. या बाबतीत कठोर पावले उचलावीत अशी मागणी महिला जिल्हा अध्यक्षा प्रविणाताई चौधरी यांनी केली आहे. त्यांच्या सोबत अन्य काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होत्या.

### तोतया टीसीवर पालघर पोलिसांची कारवाई

पालघर : गुजरातहून मुंबईकडे जाणाऱ्या मेल एक्सप्रेसमध्ये एका तोतया तिकीट चेकिंग मास्टरवर पालघर रेल्वे पोलिसांनी कारवाई केली आहे. किरण सोलंकी (राहणार, मुंबई, घाटकोपर) असे या तोतया तिकीट चेकिंग मास्टरचे नाव आहे. हा डुप्लिकेट तिकीट चेकिंग मास्टर (टीटी) गुजरातहून मुंबईकडे जाणाऱ्या १९०१५ या सुरत-बोरीवली गाडीमध्ये बसलेल्या प्रवाशांकडे शनिवार १९ जुलै रोजी रेल्वे तिकिटांची तपासणी करत होता. यावेळी ऑन ड्युटी रेल्वेचे चेकिंग तिकीट मास्टर श्याम किरण प्रसाद यांनाही बाब लक्षात आल्यावर त्यांनी रेल्वे पोलिसांच्या मार्फत त्याला डहाणू रेल्वे स्थानकात उतरवून डहाणू रेल्वे स्थानकावर कर्तव्यावर असलेले डहाणू रेल्वे पोलीस उपनिरीक्षक अरुण कुमार शर्मा, तिकीट चेकिंग मास्टर राहुल कुमार आणि प्रशांत यादव यांच्या ताब्यात दिले. त्यांनी त्याची कसून तपासणी करून पालघर पोलिसांच्या ताब्यात दिले. पालघर रेल्वे पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली आहे. याबाबत अधिक तपास पालघर रेल्वे लोहमार्ग पोलीस उपनिरीक्षक पठ्ठवल करत आहेत.

### सख्य संस्थेने राबविला वृक्षारोपण कार्यक्रम

वसई : वृक्षारोपण ही काळाची गरज आहे, कारण ते पर्यावरणाच्या संतुलनासाठी आणि मानवी जीवनासाठी आवश्यक आहे. वाढत्या प्रदूषणामुळे आणि हवामान बदलामुळे, अधिक झाडे लावण्याची गरज आहे. हा विचार करून, सफाळे स्टेशन पासून १३ किलोमीटर दूर असलेल्या. सोनावे गावात बोरीचा पाडा, जिल्हा परिषद शाळा, खाकरी पाडा आणि कातकरी पाड्यात सख्य संस्थेने फोर्थ सिग्नल इंडिया या कंपनीच्या मदतीने सीताफळ, लिंबू, पेरू, पपई आणि शेवगा या झाडांचे वाटप करण्यात आले. वृक्ष लागवड केल्याने जमिनीचा कस वाढतो, वातावरण शुद्ध होते , झाडे वादळे, पूर आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींपासून आपले संरक्षण करतात आणि फळ झाडांच्या लागवडीमुळे उत्पन्न होऊ शकते हा उद्देश ठेवून फळझाडांची लागवड करून पर्यावरण आणि महिला विकासच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले, शासनाच्या शाश्वत विकासासाठी हा वृक्षारोपण कार्यक्रम हातभार लावील असा विश्वास आहे. यावेळी विद्यार्थीवर्ग उपस्थित होते.

### वुडन हाऊस मर्डर कांदबरीचे प्रकाशन

विरार : साहित्य चावडीच्या ७२व्या पुष्पात कविवर्य विक्रांत केसरकर यांची संगीताचा शिमगो आणि संगीतकार लेखक प्रकाश पाटील यांची वुडन हाऊस मर्डर या दोन कादंबऱ्यांचे प्रकाशन विवा कॉलेजच्या उप प्राचार्या प्राजक्ता परांजपे यांच्या हस्ते करण्यात आले. दोन्हीं कादंबऱ्या खुप वाचनिय आहेत. संगीतीचे परिणाम काय असतात कोकणात शिमगो केला जातो. कोकणाच नैसर्गिक सौंदर्य या कादंबरीत लपलं आहे. तसेच साहित्यिक प्रकाश पाटील यांची वुडन हाऊस मर्डर ही कादंबरी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून प्रवास करत भारतात येते. मध्यें बरेच प्रसंग घडतात शेवट पर्यंत वाचकाला खिळवून ठेवणारी अशी हि कादंबरी आहे. याप्रसंगी चावडी सरपंच म्हणून सखाराम डाखोरे यांनी भुषविले. त्यांनी एक कविता किती जणांची असते ती कोणासाठी, कोणाच्या ह्रदयात बसते. असं कविता म्हणत मार्गदर्शनही केले. स्त्रीवादी नामवंत कवयित्री संगीता अरबुने ह्या या वर्षी कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान होत्या. त्यांनी जवळ जवळ ४० ते४५ कवींच्या कविता ग्रहण केल्या. कविता ही ह्रदयातून आली पाहिजे. असं म्हणत सर्व कविंना मार्गदर्शन केले. सुसंवादक विरेंद्र पाटील व शिल्पा फफळेकर पै यांनी सुसंवाद साधत निवेदन केले. माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व अजीव पाटील यांच्या सहकार्याने विवा कॉलेज येथे साहित्य चावडीचर पुस्तक प्रकाशन समारंभ संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपाली जाधव, सुरेखा कुरकुरे, अॅड.नयन जैन, राजेशकुमार बक्षी, विक्रांत केसरकर, हरिश्चंद्र मिठबावकर यांनी मेहनत घेतली तर ऋण निर्देश मधुकर तराळे यांनी मानले.

### शुक्ल यजुर्वेदिय माध्यंदिन ब्राह्मण सभा वसईच्या अध्यक्षपदी विजय वैद्य यांची निवड

विरार : शुक्ल यजुर्वेदिय माध्यंदिन ब्राह्मण सभा ता.वसई.वसईच्या वसई येथील गायत्री मंदिर येथे झालेल्या बैठकीत अध्यक्ष अशोक पंडित, कार्याध्यक्ष अरुण वैद्य व खजिनदार राजश्रीताई वैद्य यांनी राजीनामा दिला, त्यामुळे आज नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यात मंडळाच्या अध्यक्षपदी विजय वैद्य यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अगोदरच्या अध्यक्ष, कार्याध्यक्ष व खजिनदार यांनी आपण यापुढे हि नवीन कार्यकारिणीला मार्गदर्शन करत राहू अशी ग्वाही दिली. आज निवड झालेल्या कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष विजय वृंदावन वैद्य, कार्याध्यक्ष श्रीमती वृषालीताई विद्याधर जोशी, सरचिटणीस दिपक चंद्रकांत पंडित, खजिनदार गणेश दत्तात्रय जोशी यांची निवड करण्यात आली.

पान १ वरून....

## पत्नीची बदनामी करणाऱ्याचा साधला...

येताना रात्री दारू पिऊनच घरी येत असल्याने त्याची रोज घरच्यांच्या सोबत भांडणे होत होती. तरी ही तो काही दारू पिण्याचे कमी करीत नव्हता. त्याला एक दिसत जरी दारू प्यायला मिळाली नाही तर तो बैचेन राहत होता. काही ही करून तो आपल्या जवळच्या मित्रांना गाठून तो त्यांना दारूसाठी गळ घालत होता. त्याचे मित्र प्रेम बाळासाहेब मद्रासी, तेजस संजय राजपुत, निहाल असीफ बाबा याच्या सोबत त्याची घनिष्ट मैत्री असल्याने हे चौघे ही रोज दारू प्यायला बसत होते. प्रेम मद्रासी याची बायको त्याला सोडून दुसऱ्या सोबत त्याच्यापासून वेगळी रहात असल्याचे त्याच्या सर्व मित्रांना माहित होते. प्रेम याच्या बायकोचे आधी पासून दुसऱ्या तरूणासोबत प्रेमप्रकरण चालू असल्याचे त्याच्या मित्रांनी त्याला सांगितले होते. परंतु ते प्रकरण वाढेपर्यत प्रेमने कदाचित जाणून बजून त्या गोष्टीकडे लक्ष दिले नव्हते. ज्यावेळी त्याची बायको त्याला सोडून दुसऱ्या सोबत पळून गेल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर प्रेम मद्रासी हा जास्तीच दारू पित होता. त्याला रोज सकाळ संध्याकाळ दारू पित होता. दारू पिण्यासाठी प्रेम, अमोल. तेजस आणि निहाला हे रोज एकत्र बसत असल्याने त्यांना प्रेमचे दुःख माहित होते. ते त्याला खरे तर आधार देत असायचे यात मात्र अमोल रायत याला मात्र प्रेम बद्दल विशेष असे जास्त काही माहित नव्हते. त्यामुळे तो प्रेमच्या बायकोबद्दल आपल्या इतर मित्रात नको ते बोलत होता. मित्राची बायको दुसऱ्या सोबत राहते याचा अर्थ प्रेममध्येच काही तरी कमी आहे. असा तो अर्थ काढत होता. त्याला त्या दोघा नवरा बायकोत काय भांडणे आहेत किंवा त्याची बायको त्याला सोडून दुसऱ्या सोबत वेगळी का? राहते याचे नेमके कारण माहित नव्हते. परंतु मित्रात कुठे तर दारू पित बसले की हमखास प्रेमच्या बायकोचा विषय काढून नको नको ते बोलत होता.आपल्या बायको विषयी अमोल रायते हा गैरसमज पसरवितो आहे. तिची बदनामी करतो आहे हे बाहेरून प्रेम मद्रासीला समजले होते. त्याने एकदा दोनदा अमोल रायते याची भेट घेत आपल्या बायको विषयी नको ते पसरवू नकोस, तिची बदनामी करू नकोस असे सांगत होता. परंतु एकदा का अमोलच्या घशात दारू गेली की तो कुठे काय बोलतो याचे त्याचे त्यालाच भान राहत नव्हते. त्यामुळे दारूच्या नशेत प्रेम हा आपला जवळचा मित्र आहे आणि आपण त्याच्या बायकोबद्दल नको ते बरळत असतो हे तो विसरत होता. अमोल रायते हा आपल्या बायकोची बदनामी करीत असल्याचे प्रेम मद्रासी याने आपले मित्र तेजस राजपुत आणि निहाला बाबा यांना सांगितले होते. त्या दोघांनी ही अमोल रायते याला भेटून प्रेमच्या बायको बद्दल गैरसमज पसरवू नकोस असे सांगितले होते. परंतु अमोल काही त्याचे ऐकत नव्हता. त्याच्या मते प्रेमची बायको ही चालू असल्याने आणि ती बाहेर ख्याली असल्याने दुसऱ्यासोबत राहते असे झाले होते. अमोल हा प्रेमच्या बायकोची बदनामी करीत असल्याने प्रेमला बाहेर तोंड दाखविणे ही मुश्किल झाले होते. त्यामुळे तो जास्तच त्याचेवर चिडून होता. आपल्या बायकोची बदनामी करणाऱ्या अमोल रायते याला धडा शिकवायचा असे त्याने आपले मित्र तेजस राजपुत आणि निहाल बाबा यांना सांगितले. ते ही अमोलवर चिडून असल्याने या कामी प्रेमला मदत करण्यास ते तयार झाले. ते त्याची गेम करण्यासाठी संधी शोधत होते. सध्या आषाढ महिना चालू असल्याने श्रावण महिन्याच्या आधी अनेकजण मासांहरी आणि दारूची पार्टी करीत असतात. अमोल हा कुपवाड येथे रामकृष्णनगर येथे एकटाच राहत होता.त्याची बायको ही त्याला सोडून गेली होती. त्याची आई आणि भाऊ हे दोघे आहिल्यानगर येथे राहयला असल्याने तसे त्याचे घर रिकामेच असल्याने प्रेम, तेजस, निहाल यांनी अमोलच्या घरी दारूची पार्टी करण्याचे ठरविले. अमोलच्या घरी मंगळवार दि. २२ जुलै रोजी रात्री या चौघांनी दारू पिण्यासाठी मैफिल जमविली. प्रत्येकांने आपआपल्या पैशाने आपल्याला लागेल तेवढी दारूच्या बाटल्या पार्सल आणल्या. या चौघांना ही दोन तीन क्वार्टस एकाच वेळी लागत असल्याने चौघांनी दोन दोन क्वार्टस आणल्या. एक एक बाटली संपल्यानंतर या चौघांना ही दारूची नशा चढल्याने जो तो आपल्या मनातील बरळत होता. प्रेमची बायको पळून जावून दुसऱ्या तरूणासोबत राहते हे अमोल याला माहित असल्याने तो दारूच्या नशेत प्रेम, तेजस आणि निहाला यांना प्रेमच्या बायकोबद्दल अपशब्द वापरत प्रेमची बायको म्हणजे काय माल आहे.तिचा यार मस्तपैकी तिची जवानी सोलत असणार आणि इकडे हा आपला प्रेम हातात धरून बसलाय, आपण काय कमी आहोत काय असे तो प्रेमला उद्देशून बोलला. याचा राग प्रेमला आला. आपल्या बायको विषयी अमोल सतका घाणेरडा विचार करतो आहे याची चिड प्रेम मद्रासीला आली. तो रागाच्या भरात दारूच्या नशेत असलेल्या अमोल याला तु असले काही बोलू नकोस, नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील अशी समज दिली. परंतु आधीच दारूची नशा अमोलला जास्त झाल्याने तो उलट प्रेमवरच भडकत तुझ्यात काय दम आहे हे दिसून येते असे म्हणत त्याने त्याच्या वर्मावरच बोट ठेवले. त्यामुळे प्रेमने तेजस आणि निहाला याला खुणाविले. या तिघांनी ही अमोल रायते याला त्याच्याच घरात मारहाण करायला सुरूवात केली. ते तिघे ही त्याला खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत असताना कसे तरी अमोल त्याच्या तावडीतून सुटून घरातून ओरडत बाहेर पडला. त्याच वेळी त्याच्या घरात एक कुऱ्हाड पडली असल्याने तेजस आणि निहाल त्याचे लक्षात आले. तेजसने ती कुऱ्हाड उचलली आणि पळणाऱ्या अमोल रायते याचा पाठलाग केला. त्याचवेळी प्रेम आणि निहाल यांनी ही त्याचा पाठलाग केला. अमोल रायते हा पळत स्वामी समर्थ मंदिराच्या समोरील रस्त्यावर आला असता त्याला तेजस, प्रेम आणि निहाल यांनी गाठले. प्रेमच्या खिशात आधीच चाकू होता. त्या चाकूने त्याने अमोल रायते याच्या पोटावर सपासप वार केले. त्यासरशी तेजसने आपल्या कडील कुऱ्हाडीने त्याच्या डोक्यावर, मानेवर, हातावर आणि चेहऱ्यावर वार केले. या वारात अमोल रायते हा जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला.त्याचा तेथेच मृत्यु झाला. ही घटना घडून गेली त्यावेळी रात्रीचे १ वाजले होते. त्यामुळे रस्त्यावर ही कुणी नव्हते. अमोल रायते याला मारून प्रेम, तेजस आणि निहाल हे घटनास्थळावरून निघून गेले. दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवार दि.२३ जुलै रोजी पहाटे फिरायला येणाऱ्या लोकांना स्वामी समर्थ मंदिराच्या रस्त्यावर एका तरूणाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडला असल्याचे दिसून आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती कुपवाड पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच कुपवाड पोलीस स्टेशनचे पो.निरी.दीपक भांडवलकर यांनी आपल्या सहकार्यासह घटनास्थळी भेट दिली. कुपवाड पोलीसांनी घटनास्थळी श्वान पथकाला आणि ठसे तज्ञांना पाचारण करून या घटनेची माहिती घेत मयत तरूणाची ओळख पटविली. मयत तरूण हा त्याच परिसरात राहत असल्याने बरेच जण त्याला ओळखत होते. मयत तरूण हा अमोल रायते हा असून तो सेंट्रिंगचे काम करीत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. घटनास्थळी पोलीस अधिक्षक संदीप घुगे, अप्पर पोलीस अधिक्षक कल्पना बारवकर, पोलीस उपविभागीय अधिकारी प्रणिल गिल्डा यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेऊन त्यांनी कुपवाड पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. घटनास्थळी मयत अमोल रायते याच्या आई आणि भावाला पोलीसांना बोलावून घेतले होते. त्यांनी ही मयत तरूणाची ओळख पटवित मयत तरूण हा अमोल रायते हाच असल्याचे पोलीसांना सांगितले. घटनास्थळी स्थानिक गुन्हे शाखेचे सतिश शिंदे हे दाखल झाले. घटनास्थळावरून संशयीत आरोपी पळून गेले असल्याने त्याचा शोध स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस घेऊ लागले. इकडे घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून कुपवाड पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी सांगली सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवून दिला. या घटनेतील संशयीत आरोपीच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके तयार करण्यात आली. यातील एका पथकाला या घटनेतील संशयीत प्रेम मद्रासी आणि तेजस राजपुत हे दाघे सावळी ते ताणंग रस्त्यावर असल्याची माहिती मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील हवालदार सागर लवटे, अमीरशा फकीर यांनी तथे सापळा लावून प्रेम मद्रासी आणि तेजस राजपुत यांना ताब्यात घेऊन त्यांना कुपवाड पोलीसांच्या ताब्यात दिले. तर दुसऱ्या पथकाने तिसरा संशयीत आरोपी निहाला बाबा याला सांगली शहरातील १०० फुटी रोडवरून ताब्यात घेतले. त्याला ही कुपवाड पोलीसांच्या ताब्यात दिले. कुपवाड पोलीसांनी या तिघांच्याकडे चौकशी केली असता प्रेम मद्रासी याने पोलीसांना सांगितले की, मयत अमोल रायते याने दारूच्या नशेत त्याच्या बायकोबद्दल नको ते शब्द वापरले होते. आणि तो सारखा माझ्या बायकोची बदनामी करीत असल्याने आम्ही तिघांनी मिळून त्याला मारून टाकले. तेजस राजपुत आणि निहाला बाबा यांनी ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली. या तिघांनी गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची फिर्याद मयत अमोल रायते याच्या भावाकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादी नुसार अमोल सुरेश रायते (३२) रा.रामकृष्णनगर कुपवाड याच्या खुन प्रकरणी प्रेम बाळासाहेब मद्रासी (३५) तेजस संजय राजपुत (३८) आणि निहाल असिफ बाबा (२५) याच्या विरोधात कुपवाड पोलीस ठाण्यात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना सांगली येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर कुपवाड पोलीसांनी उभे केले असता मा.न्यायालयाने या तिघांना ही पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली कुऱ्हाह, चाकू आणि एक मोटार सायकल जप्त केली. या घटनेचा पुढील तपास कुपवाड पोलीस स्टेशनचे पो.निरी.दीपक भांडवलकर याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत. दारूच्या नशेत असणाऱ्या व्यक्तीला भान उरत नसल्याने तो काही ही बरळत असतो त्यातून तो कधी कळत न कळत आपल्या मित्राच्या बायको विषयी बोलून गेला की त्यातूनच मग अशा खूनाच्या घटना घडतात हेच यावरून दिसून येते.

## दोन भावांमध्ये घरकुलाचा वाद ...

चुलत भाऊच असून, त्याने घरकुलावरून भावा भावाच्या वादविवादातून खून केल्याची कबुली पोलिसांपुढे दिली आहे. त्याला न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायदंडाधिकाऱ्यांनी तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. चुलत भाऊ संदेश सहदेव खंडाळे (वय १९) असे आरोपीचे नाव असून, त्याला पोलिसांनी शनिवारी रात्री ताब्यात घेत आपला खाक्या दाखवला. यावेळी त्याने कार्तिकला मारल्याची कबुली दिली. या घटनेनंतर आरोपीला तपास कामासाठी पथकाने घटनास्थळी नेल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपी संदेशने कार्तिकला मंगळवारी सायंकाळी ६:३० वाजता अरणहून मोडनिंब येथे मोटारसायकलवर बसून आणले. त्याला खाण्यासाठी हॉटेलमधून पेढे व भेळ घेऊन दिली. त्यानंतर त्याला गाडीवर बसवून नेऊन त्याची हत्या केली, अशी माहिती सीसीटीव्हीतील तपासातून पुढे आली आहे. कार्तिकचा मृतदेह सापडताच टेंभुर्णी पोलिस स्टेशनचे निरीक्षक नारायण पवार, कुलदीप सोनटक्के, गिरीष जोग, सहदेव देवकते, स्वाती सुरवसे यांच्या पथकाने तपासाची सूत्रे वेगाने फिरवली. कार्तिकचा खून होऊन चार दिवस उलटत असताना त्याच्या मारेकरी सापडत नसल्याने कुटुंबात अस्वस्थता निर्माण झाली होती. दरम्यान, मृतदेह सापडताच नातेवाईक आणि ग्रामस्थ संतप्त झाले आणि पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. मोडनिंब ग्रामपंचायत येथील सीसीटीव्ही फुटेज तपासताच आरोपी चुलत भाऊ हा कार्तिकला दुचाकीवर बसवून नेताना कॅमेऱ्यात कैद झाला. त्यानंतर पोलिसांनी चुलत भावाला ताब्यात घेतले. सध्या एका आरोपीला जेरबंद केले असले तरी या प्रकरणामध्ये आणखी कोणाचा सहभाग होता का, या मुद्यावर पोलिस तपास करीत आहेत. शनिवारी रात्री सोलापूर येथून कार्तिकचा मृतदेह उत्तरीय तपासणी करून पाठविण्यात आला. रात्री १०:३० वाजता अरण येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शाळा संचालकांची मुजोरी सुरु ...

ठाण्यात दोघांवर खुनाचा गुन्हा नोंद झाला. या प्रकरणात पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील हे तपास करीत होते. स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू मुत्तेपोड, मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, चालक सिद्धेश्वर शिवणकर, विलास सातपुते, शरद सावंत यांनी केली. तांत्रिक विश्लेषणासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती, उपनिरीक्षक चंदन सिंह परिहार, वाघमारे, गणेश कोटकर, बालाजी रेड्डी, जयश्री आव्हाड यांनी केली. नमूद दोन्ही आरोपींना पूर्णा येथील न्यायालयात हजर केले जाणार होते. जगन्नाथ हेंडगे यांनी त्यांची मुलगी पल्लवी हिचा प्रवेश तिसरीच्या वर्गामध्ये बाळकृष्ण सेवाभावी संस्था वाडी, तुळजापूर संचलित हायटेक रेसिडेन्शियल स्कूल झिरो फाटा येथे जून महिन्यात घेतला होता. मुलगी पल्लवी ही निवासी शाळेत एक आठवडा राहून सहा जुलै रोजी उखळद येथे परत आली. त्यानंतर शाळेत जायचे नाही, मला तेथे राहायचे नाही, असे म्हणून ती घरीच थांबली. यानंतर १० जुलै रोजी इतरत्र प्रवेश घेण्यासाठी तिचा या शाळेतील दाखला काढून आणण्यासाठी जगन्नाथ हेंडगे आणि नातेवाईक गुरुवारी सायंकाळी पाच वाजता हायटेक रेसिडेन्शिअल स्कूलवर गेले होते. त्यावेळी जगन्नाथ हेंडगे हे शाळेच्या मुख्य कार्यालयात गेले तर सोबतचे नातेवाईक मुख्य प्रवेशद्वारावर थांबले होते. यानंतर १५ ते २० मिनिटांनी आरडाओरड करत घाबरलेल्या अवस्थेत जगन्नाथ हेंडगे तेथून बाहेर पडले. यावेळी नातेवाईकांनी काय झाले असे विचारले असता त्यांनी संस्थाचालक प्रभाकर चव्हाण व त्यांच्या पत्नीने लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याचे सांगितले व उर्वरित रक्कम द्या, असे म्हणून पुन्हा मारहाण केली. घटनेनंतर नमूद दोघे हे तेथून निघून जा नाहीतर तुमच्यावर केस करतो, असे म्हणून कारमध्ये बसून निघून गेले. जगन्नाथ हेंडगे यांना जबर मार लागल्याने ते जागीच बेशुद्ध झाले. त्यांना परिसरातील काही नागरिक व नातेवाईकांनी परभणीत एका दवाखान्यात आणले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले.

## दारूच्या व्यसनामुळे त्याचे दिवस ...

ठाण्यात सासऱ्याविरोधात तक्रार दिली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक नानासाहेब जाधव करत आहेत.

पान ८ वरून....

## पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील जिल्हा ...

करण्यात आलेले आहे. हा अध्यादेश मे महिन्यात काढण्यात आला असल्यामुळे मे महिन्याच्या नंतर राज्यातील सर्वच जिल्ह्यातील अशा प्रकारच्या कामांना स्थगिती मिळाली होती. शासनाच्या या लालफितीच्या धोरणामुळे लातूर जिल्हा रुग्णालयाला हक्काची जागा पैसे भरून आरोग्य विभागाच्या ताब्यात आल्याच्यानंतर हे बहुप्रतिक्षित लातूर जिल्हा रुग्णालय शासनाच्या या धोरणामुळे लालफितीत अडकले आहे. परंतु, राज्यशासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने शासनाने काढलेल्या या अध्यादेशाला केराची टोपली दाखवत विद्यमान शासनाच्या वतीने आपल्याच आदेशाची पायमल्ली करत दिनांक ३ जुलै २०२५ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील ४०० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाकरिता निविदा काढण्यात आलेली आहे. एकीकडे शासन आरोग्य विभागातील बांधकामांना शिस्त लावण्याची भाषा करीत राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये होऊ घातलेल्या विविध आरोग्य विभागाच्या बांधकामांना स्थगिती आदेशाला लालफितीत अडकावून चाप लावत आहे. परंतु लातूर जिल्हा हा राज्यातील एकमेव असा जिल्हा आहे की ज्या जिल्ह्यामध्ये गेल्या १६ वर्षापासून जिल्हा रुग्णालयाची मंजुरी मिळाली आहे. त्यासाठीच्या बांधकामाच्या निधीची देखील तरतूद करण्यात आलेली आहे. लातूर मध्ये नवीन जिल्हा रुग्णालय बांधण्यासाठी जागेचा प्रश्न प्रलंबित होता. याबाबत 'माझं लातूर' परिवाराच्या वतीने सलग दोन वर्षे आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष करीत लातूर शहरातील जिल्हा रुग्णालयासाठी नांदेड रोडवरील कृषी महाविद्यालयाची दहा एकर जागा शासनाने आरोग्य विभागाच्या ताब्यात द्यावी असे शासन आदेश दिले. मात्र त्याचे पैसे न भरल्याने हा प्रश्न प्रलंबित होता. यावर समन्वय साधून लातूर जिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी राज्यशासनाने जागा हस्तांतरण करण्यासाठी लागणारा ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपयांचा मोबदला कृषी विभागाला देऊन ही जागा आरोग्य विभागाच्या ताब्यात दिली. यामुळे लातूरला जिल्हा रुग्णालय बांधण्याचा प्रश्न मार्गी लागला व बहुप्रतिक्षीत आस्थापनेचे भूमीपुजन लवकरच होईल अशी अपेक्षा लातूरकर करीत होते. मात्र मे महिन्यात काढलेल्या शासन आदेशामुळे लातूरकरांच्या जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचा प्रश्न पुन्हा रखडला गेला आहे. राज्याच्या ३५ जिल्ह्यामध्ये जनतेच्या मोफत आरोग्य सुविधेसाठी जिल्हा रुग्णालय कार्यरत आहेत. केवळ लातूर हा एकमेव जिल्हा 'जिल्हा रुग्णालय' नसल्याने गेल्या एक तपापासून शासनाच्या विविध आरोग्य सुविधांपासून वंचित राहिला आहे. शासन विशेष बाब म्हणून लातूरच्या जिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण करेल, अशी अपेक्षा लातूरकर करीत असतानाच या शासनाच्या वतीने स्वतःच्याच अध्यादेशाची पायमल्ली करीत विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघट येथील ४०० खाटाच्या रुग्णालयाचे टेंडर शासनाने काढले आहे. मग मराठवाड्यातील गेल्या १६ वर्षापासून प्रतिक्षेत असणार्या विविध आंदोलनाने जिल्हा रुग्णालयासाठी जागा प्राप्त करणार्या लातूर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासाठी शासन का उदासिन आहे? लातूरकरांवर आणि विशेषतः मराठवाड्यावर हा अन्याय का? असा संतप्त प्रश्न लातूरकरांच्या वतीने या सरकारला विचारण्यात येत आहे. राज्यातील पश्र्चिम महाराष्ट्रामध्ये विशेषतः बारामतीत जवळपास २ हजार कोटीच्या विविध शासकीय इमारतींच्या कामांना या सरकारच्या काळात सुरूवात झाली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे नुकतीच पुणे जिल्ह्यात जनावरांसाठी पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अडीचशे कोटीच्या कामाचे टेंडर जुलै महिन्यामध्ये काढण्यात आले आहे तर दुसरीकडे विदर्भातील विविध कामांना हजारो कोटींचा निधी दिला जात आहे. मग मराठवाड्यावरतीच असा अन्याय का? असाही प्रश्र्न माझं लातूर परिवाराच्या वतीने उपस्थित करण्यात येत आहे. लातूरकरांच्या हक्काचे, लातूरकरांच्या गरजेचे आणि नैसर्गिक न्यायानुसार लातूरला जिल्हा रुग्णालयाचे काम तात्काळ सुरू होण्यासाठी शासनाने पावले उचलावीत अन्यथा यासाठीचे आंदोलन तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती 'माझं लातूर' च्या वतीने देण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जिल्ह्यातील एकाही सन्माननीय लोकप्रतिनिधीने यावर चकार शब्द काढला नाही याबद्दलही माझं लातूर परिवाराने नाराजी व्यक्त केली आहे. प्रलंबित जिल्हा रूग्णालय इमारतीचे भूमिपजन करून त्वरीत बांधकामास सुरुवात करावी असे पत्र देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझं लातूर परिवाराने दिले आहे.

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार ...

मेळाव्यामध्ये सहभाग नोंदविला असुन त्यापैकी ३४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले. वरील उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्याकरीता महेश कुमार सिडाम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अनंत भंगाळे, प्र.प्रा.ए.औ.प्र.सं. पालघर, वंदेश पाटील, उप प्राचार्य, यशंवतराव चाफेकर महाविद्यालय, महेश कांबळे, गटनिदेशक, प्रशांत बोकंड, गटनिदेशक, बीटीआरआय, विनीता पाटील, CII, दिपेश पागधरे, व्यवस्थापक, पागधरे प्रशिक्षण संस्था, रमेश मोरे, स्विटी दिवाकर, नरेंद्र शिरसाठ, बालाजी माने, करुणा वैद्य यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुमित सोळंकी यांनी केले.

## आगरी समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल...

यूपीएसीत यश मिळवून उच्चपदावर गेलेले राज नंदन भगत जलतरणपट्टू स्वयंतक पाटील, डॉ. करिष्मा किणी, गिर्यारोहक स्वरा पाटील, शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आदींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी महापौर नारायण मानकर यांनी आगरी भवन उभारण्याची मागणी केली त्यानुसार आगरी भवनासाठी २५ लाख रुपये देण्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी जाहीर करत सर्व जातीची यादी एकत्रित करा प्रत्येक समाजाला समाजभवन उभारण्यासाठी आपण प्रयत्न करू त्यामुळे एकाच ठिकाणी सर्व समाजाचे भवन उभे राहिला व विविध समारंभ, कार्यक्रम लोकाभिमुख कार्य करण्यासाठी फायदा होईल व यांनी जबाबदारी माजी महापौर नारायण मानकर आपण घ्या व यादी तयार करा अशी सूचना गणेश नाईक यांनी केली. या कार्यक्रमा प्रसंगी नाईक यांच्यावर प्रेम करणारे विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी भेट घेतली व त्यांचा सत्कार केला. यावेळी माजी महापौर तथा आगरी समाज विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नारायण मानकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले कि, सन १९८४ साली वसईच्या पश्चिम पट्ट्यातील आगरी समाजातील सर्व समाज एकत्र येऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आगरी समाज विकास मंडळ, वसई तालुका (प. विभाग) या संस्थेची स्थापना केली. आज रोजी ४१ वर्ष पूर्ण झाली असून या मंडळाच्या माध्यमातून वसई प्रगती को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. अर्नाळा ही पतसंस्था तसेच आगरी समाज विकास शिक्षण संस्था ह्या २ संस्थांची स्थापना झाली असून दोन्ही संस्था आपापल्या क्षेत्रात उत्तम कामगीरी करत आहेत.आगरी समाजाचे आगरी भवन स्वमालकीच्या जागेत बांधण्याचा समस्त आगरी समाज ज्ञाती बंधू भगीनींचा मनोदय असून त्यासाठी सर्व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. मात्र यासाठी आपण आगरी भावनासाठी लक्ष घालावे अशी मागणी यावेळी पालकमंत्री गणेश नाईक यांच्याकडे नारायण मानकर यांनी यावेळी केली. ते पुढे म्हणाले समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी वसई प्रगती स्थापना केली एकूण ठेवी : १८५.३३ कोटी कर्ज १२३.५२ कोटी एकूण व्यवसाय : ३०८.८५ कोटी इतका आहे तर एकूण सभासद : १५ हजार ३९० असून निव्वळ एनपीए 0 टक्के आहे अशी माहिती दिली. आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले कि, आगरी समाज हा पुढारलेला आहे. शिक्षण, व्यवसाय, नोकरीसह कला क्रीडा क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे हा समाजाचा अभिमान आहे आज अनेक ठिकाणी हुंडाबळीच्या घटना घडतात मात्र आगरी समाजात हुंडा घेतला नाही , मुलींकडे प्रेमाने पाहिले जात आहे. पालकमंत्री गणेश नाईक हे सरकारमध्ये भव्य व्यक्तिमत्व आहे ते राज्याला विकासाच्या दिशेने घेऊन जातील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसई प्रगतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हितेश पाटील यांनी केले.तर उपस्थितांचे आभार वसई प्रगतीचे अध्यक्ष अशोक पाटील यांनी मानले.

## गांधी विचारात आनंदी जीवनाची ...

योग्य-अयोग्य याची निवड तुम्हाला यशाच्या शिखरावर नेईल असे म्हटले. भोजनोत्तर सत्रात कर्नाटक सरकारच्या शिक्षण विभागाचे सह-संचालक डॉ. रामकृष्ण रेड्डी, बंगलोर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या व साहित्यिक डॉ. शरीफा, कर्नाटक गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष वुडी कृष्णा यांच्या उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन तर समन्वयक शिक्षकांना मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन सतिशकुमार के.आर. व डॉ.संतोष यांनी केले.

## पुस्तक हा श्वास आहे एकाकी जीवनाचा...

म्हणतात तसेच पुस्तक हा श्वास आहे एकाकी जीवनाचा एकमेव मित्र आहे, असे प्रतिपादन साहित्यिक कवी सुरेखा कुरकुरे यांनी विरार येथील महानगरपालिकेच्या वाचनालयातर्फे आयोजित वाचक मेळाव्यात काळं केले. या मेळाव्याला या कार्यक्रमात कोकण विभाग ग्रंथालय समितीचे अध्यक्ष दिलीप कोरे, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे सदस्य रमण पाटील, साहित्यिक आणि कवी सुरेखा कुरकुरे, उत्कर्ष विद्यालयाच्या प्राचार्य मुग्धा लेले व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना प्राचार्या मुग्धा लेले यांनी सांगितले कि, मुलांनी शिक्षणा बरोबरच अवांतर वाचन केले पाहिजे सद्याचे युग हे अश्र चं युग आहे. चॉट जीपीटीवर सर्व माहिती मिळते. पण सर्व बरोबर असतेच असं नाही मॅन्युअल इंटेलिजन्स फार महत्त्वाचा आहे. पुस्तक वाचली पाहिजे. प्रत्येकाच्या घरात एक लायब्ररी पाहिजे. आजोबा आजी असेल तर त्या मुलांना वाचनाची सवय. लवकर लागले. हरिपाठ त्यांचा तोंडीपाठ असतो. अभ्यासाची पुस्तकं तर वाचायची पण अवांतर वाचन ही केले पाहिजे, असे सांगितले. दिलीप कोरे यांनी वाचन संस्कृती जपायला हवी असे सांगितले. वाचन वाढविल्याने त्याचा फायदा आपल्याला जीवनात पुढे जाताना होतो.असे सांगितले, यावेळी रमण पाटील, हरिशचंद्र मिठबावकर यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, युवा वर्ग तसेच ग्रंथालयाच्या स्वाती घरत, अमित मोदी, अमित पाटील व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उज्वला मुदप्पू यांनी केले.

## मुसारणे जिल्हा परिषद शाळाचे ...

यापूर्वी शाळेने विविध शैक्षणिक उपक्रमांत आपले मानांकनही निश्चित केले आहे. गाला कंपनी केवळ स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देत नाही, तर सामाजिक बांधिलकी जपत मुलांच्या उज्वल भविष्यासाठी भक्कम आधार ठरत आहे, असे उपस्थित ग्रामस्थांनी आवर्जून नमूद केले. या उद्घाटन सोहळ्याला कंपनीच्या व्यवस्थापनातर्फे अवधूत पणशिकर, तुकाराम बेहेरे, योगिता भोर, तसेच ग्रामसेवक प्रतिष्ठाणचे कल्पेश ठाकरे, निवृत्त शिक्षक गुरुनाथ पष्टे, घोणसई केंद्रप्रमुख उदय पाटील, मोहन पाटील, सामाजिक कार्यकर्ते पराग पाटील, जयेश घोडविंदे, ग्रामपंचायत सरपंच राजश्री सातवी, उपसरपंच कामिनी घोडविंदे, सदस्य गौतमी भाकरे, मुख्याध्यापक पीनेश सहशिक्षक रमेश शिंदे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'वाचाल तर वाचाल'चा संदेश देत...

मुले हि वाचनाकडे वळतात. याठिकाणी असलेल्या अभ्यासिकेचा वापर करून मुले आपले भविष्य घडवत आहे हे बघून आनंद झाला. याठिकाणी युएनाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास करताना कोणतेही पुस्तक हवे असल्यास ते पालघर मध्ये उपलब्ध असेल असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात वाचन संस्कृती प्रसार आणि प्रचार या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. परिसंवादाचे सुरुवात करताना सूत्रसंचालक मकरंद सावे यांनी सांगितले कि, पुस्तके, वृत्तपत्र वाचन हे समाजोपयोगी आहेत. त्यामुळे वाचनावर अपार प्रेम केले पाहिजे. फक्त शालेय जीवनात नव्हे, तर आयुष्यभर पुस्तके साथ देतात, असे सांगितले. विलास पागर यांनी आपल्याला वाचनाचा फायदा नाट्यक्षेत्रात कसा झाला हे अनुभव सांगितले .तर डॉ.शुभम पाटील यांनी शालेय जीवनात आपल्याला वाचनाची गोडी कशी लागली. आणि पुढे त्या गोडितुन आपण कशी डॉक्टरेट मिळवली हा प्रवास उपस्थितांसमोर मांडला या कार्यक्रमात माजी नगरसेविका किरण चेंदवणकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पालिकेच्या वतीने बोलताना उपायुक्त प्रशांत जाधव यांनी सांगितले कि, पालिका आपल्या क्षेत्र वाचन संस्कृती वाढावी म्हणून वेगवेगळे उपक्रम करत आली आहे. पालिकेच्या येथील अभ्यासिकेचा उपयोग करून आज अनेक विद्यार्थ्यी अनेक स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होत आहेत. हि चंगली गोष्ट आहे . त्यांनी पालिकेच्या कर्मचाऱ्यांचेही कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार अमित मोदी यांनी मानले.

क्राईम संध्या | सोमवार दि. २८ जुलै २०२५ ते रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com


# नांदेडच्या सराईत मोटरसायकल चोराला लातूरात अटक




**लातूर : वार्ताहर**

लातूर लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे हद्दीतील ७ मोटर सायकली चोरून विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या नांदेड येथील सराईत चोरट्याला पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाला यश आले आहे. या चोरट्याकडून ७ मोटारसायकलीसह सुमारे ३ लाख ९५ हजार रुपये चा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते. पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते. त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना दि.२४ जुलै २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला शिवाजीनगर हद्दीतील घडलेल्या मोटार सायकल चोरी प्रकरणातील संशयित आरोपी बाबत खात्रीलायक माहिती मिळालेली होती. मिळालेल्या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने लातूर शहरातील सिद्धेश्वर मंदिराच्या पाठीमागे रिंग रोड भागात सापळा लावून नांदेड येथील रहिवासी असलेल्या संभा पंढरीनाथ शिकारी (वय २८ वर्ष राहणार लादगा, तालुका मुखेड जि.नांदेड) याला मोटरसायकलसह ताब्यात घेतले. त्यांच्या कडील मोटारसायकली बाबत अधिक माहिती घेतली असता त्यांनी पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. त्याला पॉलिसी खात्या दाखवतात त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली देऊन मागील काही दिवसापासून त्याने लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दी मधून मोटार सायकली चोरी केल्याचे सांगितले. सदर आरोपीच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपनीच्या सात मोटारसायकली एकूण किंमत ३ लाख ९५ हजार रुपयाच्या मोटरसायकली जप्त करण्यात आल्या.

यामध्ये पोलीस ठाणे शिवाजीनगर एमआयडीसी व गांधी चौक येथील मोटार सायकल चोरीचा प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले असून उर्वरित मोटरसायकल संदर्भाने तपास सुरू आहे. गुन्ह्याचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथका मधील पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, पोलीस अंमलदार युवराज गिरी प्रदीप स्वामी, राजेश कंचे, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, राहुल कांबळे गणेश साठे, काका बोचरे यांनी पार पाडली.

# ड्रग्स पुरवठा करणाऱ्या मुख्य सुत्रधाराला अटक

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**

मिरा- भाईंदर शहरात एमडी ड्रग्सची विक्री करणाऱ्या आणि अंमली पदार्थ विक्रीच्या गुन्ह्यात फरार असलेला मुख्य सूत्रधार कासन खान याला मिरा- भाईंदर गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने नॉर्थ गोवा येथून बेड्या ठोकत अटक केली आहे. तर सदरील अटक केलेल्या आरोपीमुळे ड्रग्स विक्रीचे मोठे रॅकेट समोर येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. तर हा आरोपी ठाणे, मुंबईसह मिरा- भाईंदर परिसरात एमडी ड्रग्सची विक्री करत होता.तसेच सदरील व्यक्तीच्या मार्फत अनेक डान्स बार आणि हुक्का पार्लरमध्ये ड्रग्स विक्री केली जात होती. मुंबई- अहमदाबाद महामार्गावर १७ मे रोजी फाउंटन हॉटेलसमोर आरोपी सोहेल इस्माईल कच्छी उर्फ रेती (वय ३६ वर्षे) आणि अनिकेत जय वर्मा (वय २७ वर्षे रा. दोघेही मिरा रोड पूर्व) यांच्याकडून ११६.७ ग्रॅम वजनाचा २३ लाख ३४ हजार रुपये किमतीचा मॅफेड्रॉन (एमडी) अंमली पदार्थ मिळून आला होता.त्यांच्याविरोधात काशिगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरील अमली पदार्थ हे आरोपी अरबाज उर्फ कासिम निसार खान (राहणार मिरा रोड पूर्व) याने विक्री करता पुरवले असल्याचे निष्पन्न झाले होते. तसेच अंमली पदार्थ विकणे विक्री करणारा कासिम खान हा सराईत आरोपी असून तो गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता. त्यावर कारवाई करून तात्काळ अटक करण्याचे आदेश पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी दिले होते. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण कक्षाने तपास करत असताना गुप्त माहितीदारी आणि तांत्रिक विश्लेषणावरून सदरील सराईत आरोपी हा गोवा राज्यात लपून बसला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ पोलीस पथक रवाना करून आरोपी अरबाज उर्फ कासिम खान (वय ३२ वर्ष) याला २१ जून रोजी रात्री दीड वाजता नॉर्थ गोव्यातून ताब्यात




घेण्यात आले. तसेच सदरील आरोपी विरोधात मिरारोड, काशिगाव आणि काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची नोंद मिळून आली तसेच त्याच्यासोबत काशीगाव पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार असलेली मुलगी सुद्धा आरोपी सोबत आढळून आली आहे. तर सदरची कारवाई ही पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, गुन्हे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे, दत्तात्रय सरग, पुष्पराज सुर्वे, पोलीस उपनिरीक्षक श्रीमंत जेधे, सहायक पोलीस उपनिरीक्षक मनोहर तावरे, आसिफ मुल्ला, संतोष मदने, पोलीस हवालदार प्रवीण पवार, समीर यादव, रवींद्र कांबळे, हनुमान सूर्यवंशी, विकास राजपूत, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, संदीप शेरमाळे, धनंजय चौधरी, रवींद्र भालेराव, विजय गायकवाड, पोलीस अंमलदार अंगद मुळे, नितीन राठोड, अमहाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान सचिन चौधरी यांनी तसेच सायबर कक्षाचे सहायक फौजदार संतोष चव्हाण यांनी केली आहे.

# सब जूनियर राज्य स्तरीय तायक्वांदो स्पर्धेत पालघरच्या अन्विका पाटील हिला सुवर्ण पदक

**वसई : वार्ताहर**

१८ ते २० जुलै २०२५ रोजी डिव्हिजन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स नाशिक येथे झालेल्या ३४वी महाराष्ट्र राज्य सब-ज्युनियर तायक्वांदो अजिंक्य पद स्पर्धा २०२५-२६ पार पडल्या यामध्ये आर्य योद्धा तायक्वांदो अकादमी विरारच्या अन्विका प्रगती अविनाश पाटील हिने २०किलो खालील वजनी गटामध्ये सुवर्ण पदक पटकावले आणि पालघर जिल्ह्याचे नाव पुन्हा एकदा राज्यस्तरावर चमकवून सुवर्णपदकाची कमाई केली. यामधे कु अन्विका पाटील ची ऑगस्ट मधे ओडिशा येथे होणाऱ्या राष्ट्रीय सब जुनिअर तायक्वांदो स्पर्धेकरिता महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. अन्विकाच्या यशाबद्दल वसई विधानसभा आमदार श्रीमती स्नेहा पंडीत दुबे व नालासोपारा विधानसभा आमदार राजन नाईक, पालघर जिल्हा क्रिडा संघटना अध्यक्ष प्रमोद



पाटील, वसई विरार शहर महानगरपालिका क्रिडा अधिकारी योगेश चौधरी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओबांसे सचिव गफार पठाण हेड ऑफ कमिटी पालघर जिल्हा प्रमुख रोहित जाधव सुनील पूर्णपात्रे व लायन्स क्लब विरार विकास यांनी सुद्धा कौतुक व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

# अकरावी प्रवेश आरक्षण २२% करण्याची खासदार डॉ. हेमंत सवरा यांची मागणी

**वाडा : वार्ताहर**

राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये अकरावी प्रवेशासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पूर्वीच्या ऑफलाइन प्रणालीमध्ये २२ टक्के आरक्षण उपलब्ध होते. परंतु सध्याच्या नव्या ऑनलाइन प्रवेश प्रणालीमध्ये हे आरक्षण केवळ ७ टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्यात आले आहे. यामुळे हजारो आदिवासी विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असून, याविरोधात विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ही बाब सामाजिक व शैक्षणिक दृष्टिकोनातून अत्यंत गंभीर असून, राज्य शासनाने तत्काळ हस्तक्षेप करून नव्या ऑनलाइन प्रवेश प्रणालीमध्येही पूर्वीप्रमाणे २२ टक्के आरक्षणाची तरतूद लागू करावी, अशी जोरदार मागणी खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी राज्य सरकार कडे केली आहे. यासोबतच, पालघरप्रमाणे इतर आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्येही ही सुधारणा लागू करून, आदिवासी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा व अकरावी प्रवेश प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व सर्वसमावेशक व्हावी, ही विद्यार्थ्यांची व समाजाची अपेक्षा आहे.

# उचाट येथील अस्पी विद्यालयात मोफत वह्यांचे वाटप



**वाडा : वार्ताहर**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे माजी जिल्हा अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उचाट येथील अस्पी विद्यालयात सामाजिक बांधिलकी जपत मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गरज लक्षात घेऊन मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी जेष्ठ नेते बाबजी काठोळे, जिल्हाध्यक्ष भरत रजपूत, जिल्हा सरचिटणीस सुशील औसारकर, जिल्हा उपाध्यक्ष पंकज कोरे, संदीप पवार, जगदीशभाई रजपूत, नरेश आकारे, युवा मोर्चा अध्यक्ष नंदन वर्तक, कुडूस मंडळ अध्यक्ष मोनिष पाटील तथा स्थानिक कार्यकर्ते, भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. सामाजिक बांधिलकीतून शैक्षणिक सहाय्य करण्याचा हेतू ठेवून आयोजित केला होता.

# डोहळे ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शुद्धोधन जाधव



**भिवंडी : वार्ताहर**

पडघा नजीकच्या डोहळे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी शुद्धोधन अशोक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उप सरपंच दिनेश ठाकरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्या नंतर रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठी शुक्रवारी डोहळे ग्रामपंचायत येथे निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत शुद्धोधन जाधव यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने पिठासीन अधिकारी तथा डोहळे ग्रामपंचायतच्या सरपंच सुमन वाघे यांनी जाधव यांची उपसरपंच पदी नियुक्ती जाहीर केली. शुद्धोधन जाधव यांची उपसरपंच म्हणून नियुक्ती होताच कार्यकर्त्यांनी फटाके फोडत व ढोल ताशाच्या गजरात आनंद व्यक्त केला. याप्रसंगी भिवंडी पश्चिमचे आ. महेश चौघुले, आरपीआय आठवले गटाचे भिवंडी शहराध्यक्ष महेंद्र गायकवाड,माजी नगरसेवक विकास निकम व परिसरातील नागरिकांनी जाधव यांना शुभेच्छा दिल्या. गावातील नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आपण निश्चितच पार पाडणार असून गावातील विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहणार आहोत अशी प्रतिक्रिया उपसरपंच शुद्धोधन जाधव यांनी व्यक्त केली आहे.

# श्रावणात पहिल्यांदाच एसटीचे पॅकेज टूर; एसटी प्रशासनाकडून ज्योतिर्लिंग व अष्टविनायक दर्शनाचे नियोजन

**विरार : वार्ताहर**

राज्य परिवहन महामंडळाच्या श्रावण पॅकेज टूरच्या अनुषंगाने पालघर एसटी विभागाने उत्पन्न वाढीसाठी पहिल्यांदाच विशेषतः श्रावण महिन्यात ज्योतिर्लिंग दर्शनासाठी पॅकेज टूरचे आयोजन केले आहे. या टूर वसई, नालासोपारा, अर्नाळा, पालघर आणि बोईसर येथून त्र्यंबकेश्वरसाठी उपलब्ध करण्यात आल्या असून याच ठिकाणांहून भीमाशंकर दर्शनासाठीही बसेस सोडण्यात येणार आहेत. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पॅकेज टूरमधून राज्यात चांगला महसूल मिळाला आहे. त्यादृष्टीने पालघर विभागाने कमी गर्दीच्या हंगामात विशेषतः पावसाळ्यात आणि सणासुदीच्या काळात उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने पॅकेज टूरच्या आयोजनावर भर दिला आहे.

यासंदर्भात पालघर विभागातील पालघर, सफाळे, वसई, अर्नाळा, डहाणू, जव्हार, बोईसर, नालासोपारा या सर्व आगार व्यवस्थापकांना विभाग नियंत्रकांनी विशेष सूचना दिल्या आहेत. आषाढी एकादशी दरम्यान पंढरपूर यात्रेला भाविकांचा मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता श्रावण महिन्याच्या संकष्ट चतुर्थीनिमित्त ११, १२ व १३ ऑगस्ट २०२५ रोजी पालघर येथून अष्टविनायक दर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. याकरिता प्रवाशांच्या सोयीसाठी आगाऊ आरक्षण तिकीट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पालघर विभागाच्या या उपक्रमांमुळे पर्यटनाला चालना मिळण्यासोबतच भाविकांना धार्मिक स्थळांना भेटी देणे सोयीचे होणार आहे. आगार पातळीवर पॅकेज टूरचे



नियोजन करण्यास यापूर्वीच कळविण्यात आले होते, मात्र अद्याप कोणत्याही आगाराकडून याबाबत ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे या नियोजनामुळे पालघर विभागातील राज्य परिवहनच्या उत्पन्नात वाढ होऊन प्रवाशांना विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळांना भेट देणे अधिक सोयीचे होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

यापूर्वी आषाढी एकादशीनिमित्त पालघर विभागामार्फत ८२ बसेसच्या पॅकेज टूरचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. ज्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या यशातूनच प्रेरणा घेऊन श्रावण महिन्यात अष्टविनायक व ज्योतिर्लिंग दर्शनाचे नियोजन करण्यात आले आहे. प्रवाशी संघटनांनी किंवा ग्रुपने त्यांच्या सोयीनुसार बसेसची मागणी केल्यास, त्यानुसार बसेस पुरवण्याची व्यवस्था केली जाईल, असे विभाग नियंत्रक कैलास पाटील यांनी सांगितले. पॅकेज टूर यशस्वी करण्यासाठी आणि अधिकाधिक प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी बसस्थानकांवरील दर्शनी ठिकाणी प्रवाशांसाठी पॅकेज टूरची सविस्तर माहिती प्रदर्शित करावी, बसस्थानकांवर संगणकीय उद्घोषणा, जाहीरातीद्वारे प्रसिद्धी, ग्रामीण संपर्क अभियान, फ्लेक्स बॅनर, प्रवासी सुविधा नियोजन या उपाययोजना राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कमी गर्दीच्या हंगामात विशेषतः पावसाळ्यात विविध मान्सून पर्यटन स्थळे, श्रावण महिन्यात ज्योतिर्लिंग दर्शन, साडेतीन शक्तिपीठे, पंढरपूर दर्शन, तुळजापूर-अक्कलकोट दर्शन, थंड हवेची ठिकाणे, अष्टविनायक दर्शन अशा विविध पॅकेज टूरचे नियोजन करण्याची सूचना करण्यात आली आहे. अशा टूरमुळे राज्य परिवहनच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. त्रंबकेश्वर, वणी, सप्तशृंगी गड, रेणुकामाता मंदिर, शिर्डी, नाशिक दर्शन, जव्हार राजवाडा व परतीचा मार्ग असे नाशिक दर्शन करण्यात येईल.

दरम्यान दर्शनासाठी इच्छुक नागरिकांसाठी नालासोपारा ते अष्टविनायक दर्शन - ११४७, पालघर ते अष्टविनायक - १२५७, वसई ते अष्टविनायक - ११४७, अर्नाळा ते अष्टविनायक - १२०७, पालघर ते नाशिक दर्शन - ११६७, वसई ते नाशिक दर्शन - ११६७, बोईसर ते नाशिक दर्शन - ११४७, जव्हार ते नाशिक दर्शन - ९४६, डहाणू ते नाशिक दर्शन - १०९६ असे आगार व शुल्क आकारण्यात येणार आहे.

# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भरधाव वाहनाने सात गायींना चिरडले



**डहाणू : वार्ताहर**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी (२२ जुलै) पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. गुजरातहून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात अवजड वाहनाने तलासरी तालुक्यातील दापचारी जकात नाक्याच्या पुढे रस्त्याच्या मध्यभागी बसलेल्या गुरांच्या कळपाला जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत सात गायींचा जागीच मृत्यू तर तर तीन गायी गंभीर जखमी झाल्या आहेत. घटनेनंतर कासा-चारोटी हद्दीतील प्राणीमित्र, गोरक्षक व तलासरी पोलीस ठाण्याचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त जखमी जनावरे उमरगाव येथील गोशाळेत उपचारासाठी हलवण्यात आली. तर मृत जनावरांचे शव पोलीस देखरेखीखाली जागेवरच दफन करण्यात आले. सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात महामार्गाच्या कडेला आणि मध्यभागी मोठ्या प्रमाणावर गवत उगवले आहे. परिणामी, मोकाट जनावरे चारा शोधत रस्त्यांवर भटकताना दिसून येतात. रात्रीच्या अंधारात ही जनावरे रस्त्याच्या मधोमध बसलेली असतात आणि भरधाव वाहनचालकांना ती वेळेवर न दिसल्याने अशा दुर्घटना घडतात. या अपघातातही असाच प्रकार घडल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या दुर्घटनेने महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने काही ठिकाणी लोखंडी बॅरिकेड्स, बांबूंची कुंपणं बसवली असली तरी ती अत्यंत अपुरी, कमकुवत असल्याचे वास्तव या अपघाताने उघड केले आहे. महामार्गावरील वाढत्या वाहनांच्या संख्येच्या तुलनेत सुरक्षा यंत्रणा अत्यंत मर्यादित आणि निष्क्रिय असल्याची टीका स्थानिक नागरिक आणि गोरक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी दाखल झालेले प्राणीमित्र बाबू सिंग यांनी सांगितले की, महामार्गावर दररोज एखाद्या जनावराचा बळी जातो. यासाठी महामार्ग प्राधिकरणाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. आम्हाला माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेतली. जखमी गायींना तातडीने उपचारासाठी उमरगाव गोशाळेत हलवले. मृत गायींचे दफन पोलिसांच्या देखरेखीखाली पार पाडले. त्यांनी पुढे सांगितले की, महामार्गाच्या दोन्ही बाजूंना मजबूत कुंपण करणे, जनावरांच्या सुरक्षित ओलांडण्यासाठी बोगदे किंवा उड्डाणपूल उभारणे आणि वाहनचालकांसाठी चेतावणी फलक व रात्रचिन्हे बसवणे यासारख्या उपाययोजना तातडीने केल्या गेल्या पाहिजेत. शेती यांत्रिकीकरणामुळे, खर्च व जनावरांच्या व्यवस्थापनाचा त्रास वाढल्यामुळे अनेक शेतकरी आज त्यांच्या गुरांना मोकाट सोडत आहेत. परिणामी, महामार्ग व शहरी भागात मोकाट गुरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे वाहन अपघातांची संभाव्यता वाढत असून अनेक वेळा वाहनचालकांनाही जीव गमवावा लागतो. या दुर्दैवी घटनेनंतर स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, प्राणीमित्र आणि नागरिकांनी शासन, महामार्ग प्राधिकरण, पोलीस प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना तत्काळ संयुक्त कृती आराखडा आखण्याची मागणी केली आहे. अशा घटनांमुळे मानवी व पशुजीवन दोन्ही धोक्यात येत असून, सुरक्षित महामार्ग रचणे ही काळाची गरज बनली आहे.

# अखेर महामार्गावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात

**वसई : वार्ताहर**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील ससुपाडा येथील प्रीतम ढाबा ते नवीन वर्सोवा पूलदरम्यानच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. यामुळे सतत वाहतूक कोंडीच्या समस्येला तोंड द्यावे लागत असल्याने नागरिकांनी महामार्ग रोको आंदोलनाचा इशारा दिला होता. या आंदोलनाच्या पूर्वीच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने खड्डे बुजविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे येथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. वसईच्या पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद महामार्ग गेला आहे. पण या महामार्गावरील ससुपाडा येथील प्रीतम ढाबा ते नवीन वर्सोवापुला दरम्यानच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच या खड्ड्यामुळे वाहतूक सेवेवर परिणाम होऊन प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत होती. कोंडीमुळे शाळकरी विद्यार्थी, नोकरदार नागरिक, रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन सेवांना अडथळा निर्माण होत आहे. पण याबाबत वारंवार तक्रारी करूनही त्याकडे महामार्ग प्राधिकरणाने दुर्लक्ष केले असल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी शनिवारी स्वखर्चाने खड्डे



बुजवा आंदोलन व महामार्ग रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. या आंदोलनामुळे मुंबई, ठाणे या ठिकाणी जाणारी वाहतूक सेवा विस्कळीत होण्याची शक्यता होती. त्यापूर्वीच नायगाव पोलीस व महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी व भूमिपुत्र फाऊंडेशनचे अध्यक्ष सुशांत पाटील व ग्रामस्थ यांची बैठक घेतली. याच दरम्यान महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने खड्डे बुजविण्याचे काम सुरू करू असे आश्वासन दिले. त्यामुळे ग्रामस्थांनी सामंजस्य दाखवत आंदोलन स्थगित केले. शनिवार सकाळ पासून महामार्गावर प्रामुख्याने जुना वर्सोवा, प्रीतम ढाबा, ससूनवघर अशा भागात खड्डे बुजविले जात असल्याचे महामार्ग प्राधिकरणाने सांगितले आहे.

28 JULY TO 03 AUGUST 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 7/26/2025 9:21 PM Page 1



# पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील जिल्हा रुग्णालयांची कामे प्रगतीपथावर मात्र लातूर जिल्हा रुग्णालय मंजूर असतानाही लालफितीत का अडकलंय?




**लातूर : वार्ताहर**

एकीकडे शासनाने आरोग्य विभागातील बांधकामांना शिस्त लावण्याच्या नावाखाली राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये होऊ घातलेल्या विविध आरोग्य विभागाच्या बांधकामांना स्थगिती आदेश दिला आहे. मात्र विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघट येथील ४०० खाटाच्या रुग्णालयाचे टेंडर शासनानेच काढले आहे. मात्र मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यासाठी मंजूर असलेल्या जिल्हा रुग्णालयासाठी शासन का उदासिन आहे? असा संतप्त सवाल लातूरकरांमधून विचारला जात आहे. तर गेल्या १६ वर्षांपासून आरोग्य सेवेपासून वंचित राहिलेल्या जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्य सुविधेचा हा अनुशेष शासन कधी भरून काढणार याकडे मराठवाड्याचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने २९ मे २०२५ रोजी शासन निर्णय पारित करण्यात आला होता की, मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेमध्ये राज्यातील आरोग्य सेवेच्या पायाभूत सुविधांच्या संदर्भात शिस्त आणणे आणि नियोजित पध्दतीची कामे हाती घेण्याचे निर्देश दिले. या अनुसरून सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत बांधकामांना शिस्तबध्द कार्यक्रम हाती घेण्याचे शासनाने ठरवले. या माध्यमातून ज्या आरोग्य संस्थांचे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व इतर नवीन रुग्णालय, श्रेणीवर्धित रुग्णालय यांच्या बांधकामाबाबत त्याचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत अशी सर्व बांधकामे पूर्ण करणे आवश्यक आहे. ही कामे पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही नवीन आरोग्य संस्थांची बांधकामे मंजूर किंवा सुरू करता येणार नाही. ज्या आरोग्य संस्थांची बांधकामे मंजूर आहेत, मात्र त्यांचे बांधकाम हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकास सुरू झालेले नाही किंवा ज्यांच्या बांधकामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत, त्यांच्या निविदा काढल्या असल्या तरीही अशा सर्व आरोग्य संस्थांच्या कामाच्या प्रशासकीय मान्यता सद्यस्थितीत रद्द करण्यात येत आहेत असे या आदेशामध्ये स्पष्टपणे नमूद ...पान ६ वर

# जन सुरक्षा विधेयक रद्द करण्यासाठी वाड्यात काँग्रेसचे आंदोलन




**वाडा : वार्ताहर**

पालघर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जन सुरक्षा विधेयक रद्द करण्याच्या मागणीसाठी वाडा येथे पालघर जिल्हा अध्यक्ष प्रफुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले होते. लोकशाहीवर घाला आणणारा जन सुरक्षा विधेयक रद्द करा अशा आशयाचे फलक हातात घेऊन व घोषणा देत वाडा बस स्थानका समोर सोमवारी (दि.२१जुलै) आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारने लोकशाहीचा गळा घोटणारे हे विधेयक आणल्याचा आरोप यावेळी जिल्हाध्यक्ष प्रफुल पाटील यांनी केला. या आंदोलनात विविध भागातील कार्यकर्ते सहभागी झाले होते. या वेळी काँग्रेस नेत्यांनी सरकारचा निषेध नोंदवला आणि हे विधेयक तात्काळ मागे घेण्याची मागणी करून विधेयक जाळून सरकार विरोधी घोषणा दिल्या व शिष्टमंडळाने एकत्र जाऊन तहसीलदार मार्फत शासन दरबारी निवेदन दिले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष प्रफुल पाटील यांच्यासह, तालुका अध्यक्ष दिलीप पाटील, वाडा शहर अध्यक्ष सुशील पातकर, सरचिटणीस कैलास पाटील, महिला अध्यक्षा साक्षी पाटील, माजी नगरसेवका विशाखा पाटील, भारती सपाटे, किसान काँग्रेसचे तालुका अध्यक्ष जयवंत पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व करीअर मार्गदर्शन शिबीर



**पालघर : वार्ताहर**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यामध्ये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये १ हजार रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पालघर जिल्हयामध्ये या आर्थिक वर्षामध्ये जवळपास २० रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्याचा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ,पालघर या कार्यालयामार्फत नियोजन करण्यात आलेले आहे. सदर रोजगार मेळाव्याकरीता आ.राजेंद्र गावित यांनी अध्यक्षपद भूषवुन कार्यक्रमाची शोभा वाढवली तसेच उपस्थित बेरोजगार युवकांना पालघर जिल्हयामध्ये तसेच भविष्यात येणाऱ्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले. रोजगार मेळावे जिल्हयातील तसेच महाराष्ट्रातील तरुणांना रोजगाराची संधी निर्माण करण्यासाठी आयोजित करण्यात येणार असुन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , पालघर व यशवंतराव चाफेकर कॉलेज, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ जुलै २०२५ रोजी, यशवंतराव चाफेकर कॉलेज, पालघर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त रेणुका तम्मलवार यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत माहिती दिली. त्यानंतर श्री महेशकुमार सिडाम, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पालघर यांनी वाढवण बंदराच्या अनुषंगाने जिल्हयामध्ये उपलब्ध होणाऱ्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले. बेरोजगार युवकांना येणाऱ्या काळात कोणकोणत्या क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध होतील तसेच AI च्या भविष्यातील संधी याबाबत नॅशनल ज्युनीअर कालेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, वाडा व ऋषी कॉम्प्युटर एज्युकेशन, वसई येथे व्यवसाय मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याकरीता किरण साळवे आणि सुरेखा भोसले यांचे विशेष सहकार्य लाभले. या रोजगार मेळाव्यामध्ये पालघर जिल्हयातील एकुण ८ आस्थापना/कंपनी यांनी ४१६ रिक्तपदांची नोंदणी केलेली होती. याकरीता एकुण १८१ उमेदवारांनी सदर रोजगार ...पान ६ वर

# आगरी समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे-गणेश नाईक




**वसई : वार्ताहर**

प्रत्येकाने जीवनाचा अर्थ समजून घेतला पाही, आमदारकी, खासदारकी मंत्री हे सारे क्षणभंगुर आहे, लोकांचे प्रेम कायम असते मी शिवसेना, राष्ट्रीवादीत असताना देखील मंत्री झालो आणि भाजपमध्येही मंत्री आहे हे लोकांचे प्रेम आहे. ठाणे जिल्ह्यात मी सिनियर आहे. आगरी समाज हा पूर्वीपासून एकजुटीने राहिला, अडलेल्या नडलेल्यांच्या मदतीला रात्रंदिवस उभा राहत आहे. आज समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे शिक्षणासह कला क्रीडेमध्ये, उच्च पदावर नाव उज्वल करत आहे. अशा शब्दात आगरी समाजबांधवांचे वनमंत्री तसेच पालघर जिल्हा पालकमंत्री गणेश नाईक यांनी वसई येथील कार्यक्रमात भरभरून कौतुक केले.

आगरी समाज विकास मंडळ, वसई तालुका, वसई प्रगती को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड अर्नाळा आणि आगरी समाज विकास शिक्षण संस्था वसई यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी व गुणीजन सत्कार समारंभ व आगरी समाज विकास निधी वाटप कार्यक्रमाचे आयोजन उमेळमान आगरी समाज विकास शिक्षण संस्था येथे करण्यात आले. यावेळी वनेमंत्री व पालकमंत्री गणेश नाईक, आमदार ज्ञानेश्वर पाटील माजी महापौर तथा आगरी समाज विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नारायण मानकर आगरी समाज विकास मंडळाचे वसई तालुका अध्यक्ष भरत भोईर व वसई प्रगतीचे अध्यक्ष अशोक पाटील, माजी अध्यक्ष मदन किणी भाजप नेते शेखर धुरी, वसई प्रगतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हितेश पाटील, माजी नगरसेवक कल्पेश मानकर, माजी नगरसेवक सचिन घरत यांच्यासह आगरी समाज, विविध पक्षाचे कार्यकर्ते, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री गणेश नाईक व आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे शाळेच्या प्रांगणात लेझीम व ढोलताशा पथकाकडून स्वागत करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्व्लनाने करण्यात आली त्यानंतर ...पान ६ वर

# पोलिसांसाठी 'सामाजिक परिस्थिती व कायद्याची अंमलबजावणी' या विषयावर प्रशिक्षण सत्र संपन्न



**विरार : वार्ताहर**

सख्य महिला मार्गदर्शन केंद्र, निर्मळ यांच्यातर्फे पोलिसांसाठी सामाजिक परिस्थिती व कायद्याची अंमलबजावणी या विषयावर दोन तासांचे प्रशिक्षण सत्र दि. १९ जुलै २०२५ रोजी बोळींज पोलीस ठाणे, विरार येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण सत्राचे उद्दीष्ट बदलती सामाजिक परिस्थिती, विविध घटकांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आणि कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी याविषयी पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे होते. यावेळी सख्य महिला मार्गदर्शन केंद्राच्या विधी सल्लागार ॲड. विद्या पाटील यांनी मार्गदर्शन केले. या सत्रात विशेषतः महिलांसाठी असलेले कायदे, घरगुती हिंसाचारात फक्त शारीरिक हिंसा नाही तर मानसिक, आर्थिक व लैंगिक शोषण याचा देखील कसा विचार करणे आवश्यक आहे हे उदाहरणे देऊन समजावून सांगितले. झजडक प्रिवेंन्शन ऑफ सेक्शुअल हॅरेसमेंट ॲट वर्कप्लेस, Internal Committee, विशाखा कमिटी याविषयी माहिती दिली.

## कर्नाटकात गांधी विचार संस्कार परीक्षेचे पारितोषिक वितरण

# गांधी विचारात आनंदी जीवनाची ताकद -गिरीश कुळकर्णी



**जळगाव : वार्ताहर**

सध्याच्या भौतिक जगात आपण वस्तू संग्रहाच्या मागे लागलो आहोत, मिळाले नाही तर आपण दुःखी होतो मात्र आपल्या जवळ जे आहे ते इतरांना दिल्याने आपण आनंदी व्हाल आणि हेच गांधी विचारांचे मूळ आहे असे प्रतिपादन गांधी रिसर्च फाऊंडेशनचे परीक्षा नियंत्रक गिरीश कुळकर्णी यांनी केले. गांधी रिसर्च फाऊंडेशन, कर्नाटक गांधी स्मारक निधी व बंगलोर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेच्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर बंगलोर विद्यापीठाचे कुलसचिव शेख लतीफ, एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. रमेश एस. कित्तुर, समन्वयक डॉ. अबिदा बेगम व कर्नाटक गांधी स्मारक निधीचे कोषाध्यक्ष एच. व्ही. दिनेश होते. गिरीश कुळकर्णी पुढे म्हणाले कि, विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या जीवनातून स्वावलंबन, सत्याचा आग्रह, शांती व प्रेमभाव घेतला पाहिजे. आपण महापुरुषांच्या जीवनातून जे शिकतो व समजतो त्याप्रमाणे आचरण केले पाहिजे. सामाजिक समस्यांना सामोरे जाण्यासाठी पुढाकार घेतल्यास समाज आपल्या पाठीशी उभा राहतो. त्यांनी कन्नड भाषेतून भाषणास सुरुवात करून उपस्थितांची वाहवा मिळविली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधीजींना पुष्प वंदना करुन व झाडाला पाणी घालून करण्यात आली. डॉ. अबिदा बेगम यांनी प्रास्ताविक केले. उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना कुलसचिव शेख लतीफ यांनी चांगला माणुस ही देशाची संपत्ती असून आपला परीक्षेतील सहभाग ही चांगला माणुस घडण्याची प्रक्रिया आहे' असे म्हटले. कार्यक्रमाधिकारी प्रा. रमेश कित्तुर यांनी विद्यार्थ्यांनी रिल्स मागे न लागता गांधी विचारांच्या मागे लागले पाहिजे. अहिंसा हे ताणतणावावरील रामबाण औषध आहे. अध्यक्षीय मनोगतात एच. व्ही.दिनेश यांनी मोबाईलचा विवेकी वापर, ...पान ६ वर

# वसईच्या अमित राठोड यांनी १५,७०० फूट उंचीवरील शितिधार शिखर सर केले



**वसई : वार्ताहर**

वसईचे रहिवासी अमित सिताराम राठोड यांनी हिमालयातील १५,७०० फूट (४,८०० मीटर) उंचीवरील शितिधार शिखर सर करत अत्यंत थरारक आणि प्रेरणादायी कामगिरी बजावली आहे. त्यांनी हिमाचल प्रदेश, मनाली येथील अटल बिहारी वाजपेयी माउंटेनियरिंग अँड ॲडव्हेंचर स्पोर्ट्स इन्स्टिट्यूट (BVIM-S) मध्ये बेसिक माउंटेनियरिंग कोर्स (BMC) यशस्वीरित्या पूर्ण केला. या प्रशिक्षणात हिमालयातील प्रतिकूल परिस्थितीत चढाई, बर्फात चालण्याचे तंत्र, दोर वापर, आपत्कालीन बचाव कार्यप्रणाली यांचे सखोल शिक्षण दिले जाते. अमित यांनी मनाली येथून चढाईला सुरुवात करून सोलांग नाला, त्यानंतर बकरथाच बेस कॅम्प पार करत अखेर पिर पंजाल पर्वतश्रेणीतील शितिधार शिखर यशस्वीरित्या गाठले. भारत सरकारच्या युवा आणि क्रीडा मंत्रालयाच्या मान्यतेने हे प्रशिक्षण घेण्यात आले असून, ते अत्यंत कठीण व मानसिक-शारीरिक क्षमतेची कस पाहणारे मानले जाते. अमित यांची ही यशोगाथा तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अमित यांचा पुढील उद्देश कंचनजंगा, एव्हरेस्ट यांसारख्या जगातील सर्वोच्च शिखरांवर भारताचा तिरंगा फडकवण्याचा आहे, असे अमित सीताराम राठोड यांनी सांगितले.

# पुस्तक हा श्वास आहे एकाकी जीवनाचा एकमेव मित्र आहे - सुरेखा कुरकुरे




**विरार : वार्ताहर**

लहान मुलं संवेदनशील असतात. घरातमोठी माणसे वाचन करत असतील तर मुलांना वाचनाची गोडी निर्माण होते. पण वाचन शब्द कसा तयार झाला वाचन - वचन - शपथ - पंथ म्हणजे मार्ग व म्हणजे शंभर टक्के, म्हणजेच वाचनाने माणूस शंभर टक्के यशस्वी होण्याचा मार्ग आहे वाचनात दोन प्रकार आहेत. प्रकट वाचन आणि मुकवाचन अभिवाचन प्रकट वाचन म्हणजे मोठ्याने वाचणे. स्वतः साठी व दुसऱ्यांसाठी. आवाजातील चढ उतार व्याकरण बोलण्यातून ओघवती शैली जाणवली पाहिजे म्हणजे लक्षात राहण्यास मदत होते. मुक वाचन म्हणजे स्वतःच्या आनंदासाठी मनात वाचणे. रोज एक पुस्तकाचे पान तरी वाचले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे वाचाल तर वाचाल असे ...पान ६ वर

# मुसारणे जिल्हा परिषद शाळाचे नूतनीकरण




**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील मुसारणे गावातील जिल्हा परिषद शाळेच्या नव्याने नूतनीकरण करण्यात आलेल्या इमारतीचे उद्घाटन आज उत्साहात पार पडले. ही शाळा मागील काही वर्षापासून मोडकळीस आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी तसेच शिक्षकांना अध्यापनासाठी योग्य, आरोग्यदायी आणि खेळती हवा असलेले वातावरण लाभत नव्हते. या स्थितीची दखल घेऊन गाला प्रिसीजन इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीचे मालक किरीट गाला यांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंडाच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य केले. ग्रामसेवा प्रतिष्ठाणच्या सहकार्याने शाळेचे संपूर्ण नूतनीकरण करण्यात आले. नवीन रूपात सजलेली ही शाळा आता तालुक्यातील नवोपक्रमांची प्रयोगशाळा म्हणून ओळखली जात आहे. ...पान ६ वर

# 'वाचाल तर वाचाल'चा संदेश देत वाचन संस्कृती टिकविण्यासाठी वाचक मेळावा कार्यक्रमाचे आयोजन




**वसई : वार्ताहर**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच नवघर येथील के. डॉ.के.व. हेडगेवार सार्व. वाचनालयाच्या वतीने वाचक मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला कोकण विभाग ग्रँथालय समितीचे अध्यक्ष दिलीप कोरे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील, कोकण विभाग ग्रंथालय संघाचे सदस्य रमण पाटील, सुप्रसिद्ध नाट्य दिगदर्शक, समीक्षक विलास पागर, विवा महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. शुभम पाटील, महानगरपालिकेच्या ग्रँथालय विभागाचे उपायुक्त प्रशांत जाधव, माजी नगरसेविका सौ. किरण चेंदवणकर व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात अभ्यासिकेत अभ्यास करून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना दिलीप कोरे यांनी वाचन संस्कृती जपायला हवी असे सांगितले. वाचन वाढविल्याने त्याचा फायदा आपल्याला जीवनात पुढे जाताना होतो. तर प्रशांत पाटील यांनी वाचनालयाचे आणि त्याठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. असे वाचनालय असल्यास ...पान ६ वर